• पंढरपूर • मंगळवार, २८ जानेवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - २४८



आवताडे शुगरच्या कर्मचाऱ्यांना वेतन वाढ PII



भाविकांच्या आरोग्य व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे - प्रांताधिकारी..... PIII

# वक्फ संशोधन विधेयक मंजूर

## समितीकडून १४ बदल; विरोधकांच्या सूचना फेटाळल्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रस्तावित वक्फ बोर्ड विधेयकावर सखोल चर्चा करण्यासाठी ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं. यावर दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत मोठी खडाजंगी पाहायला मिळाली. या वादानंतर बैठकीत समितिचे अध्यक्ष जगदम्बिका पाल यांच्यावर हुकुमशाही कारभार करत असल्याचा आरोप विरोधी खासदारांकडून करण्यात आला. यावर गोंधळ घालणाऱ्या १० खासदारांना दिवसभरासाठी निलंबितही करण्यात आले. यानंतर आज झालेल्या संयुक्त समितीच्या बैठकीत या विधेयकासंदर्भात सत्ताधाऱ्यांनी मांडलेल्या १२ सुधारणा मंजूर करण्यात आल्या असून विरोधी खासदारांनी मांडलेल्या ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्या. वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक २०२४ नुकत्याच संपलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मांडण्यात आलं. हे विधेयक संसदेच्या संयुक्त समितीकडे सविस्तर चर्चेसाठी पाठवण्यात आले. यासंदर्भात समितीच्या सोमवारी झालेल्या बैठकीत १२ सुधारणा मंजूर करण्यात आल्या तर ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्या. मंजूर करण्यात आलेल्या १२ सुधारणा या सत्ताधारी भाजपा आणि एनडीए आघाडीतील इतर मित्रपक्षांकडून मांडण्यात आल्या होत्या. तर फेटाळण्यात आलेल्या ४४ सुधारणा या विरोधी पक्षांकडून मांडण्यात आल्या होत्या.



"या विधेयकावर प्रत्येक कलमानुसार चर्चा करण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी विरोधी पक्षांकडून मांडण्यात आलेल्या सर्व ४४ सुधारणा मी त्यांच्या नावासकट वाचून दाखवल्या. मी त्यांना विचारलं की त्यांना या सुधारणा सुचवायच्या आहेत का? त्यानंतर त्या मांडल्या गेल्या. ही प्रक्रिया याहून अधिक लोकशाही पद्धतीने होऊ शकली नसती.

— जगदम्बिका पाल

### भाजपाच्या सर्व १० दुरुस्ती प्रस्तावांना मंजुरी -

• या बैठकीत भाजपच्या खासदारांनी १० दुरुस्त्या मांडल्या आणि सर्व सुधारणांना मंजुरी देण्यात आली. त्याचवेळी विरोधकांनी अनेक सुधारणा मांडल्या, पण मतदानानंतर त्या सर्व फेटाळण्यात आल्या. विरोधकांनी मांडलेल्या सर्व सुधारणा १०-१६ मतांनी फेटाळण्यात आल्या. भाजपने मांडलेल्या सर्व सुधारणा १६-१० मतांनी मान्य करण्यात आल्या.

### कार्यपद्धतीवर आरोप

• विरोधी पक्षाच्या खासदारांनी बैठकीच्या कामकाजावर टीका केली आणि पाल यांच्यावर लोकशाही प्रक्रियेला कमकुवत केल्याचा आरोप केला. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, ही एक दिखाऊ बैठक होती. आमचं ऐकलंही गेलं नाही. पाल यांनी हुकूमशाही पद्धतीने काम केले आहे. दुसरीकडे पाल यांनी हे आरोप फेटाळून लावले आणि संपूर्ण प्रक्रिया लोकशाही होती आणि बहुमताने निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले.

### ४४ प्रस्तावांपैकी १४ बदलांना मंजुरी -

• समितीसमोर एकूण ४४ बदल सादर करण्यात आले, मात्र केवळ १४ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. पाल म्हणाले की, विरोधी सदस्यांनी विधेयकाच्या सर्व ४४ कलमांमध्ये शेकडो दुरुस्त्या प्रस्तावित केल्या होत्या परंतु त्या मतदानाद्वारे फेटाळण्यात आल्या. विद्यमान वक्फ मालमत्तांचा वापर धार्मिक कारणांसाठी केला जात असेल तर विद्यमान कायद्यातील 'वक्फ बाय युजर'च्या आधारे त्यांना आव्हान देता येणार नाही, अशी महत्त्वपूर्ण दुरुस्ती समितीने प्रस्तावित केली आहे.

## चौदा वर्षाच्या मुलाची डोक्यात गोळी झाडून आत्महत्या



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माढा तालुक्यातील आढे गावातून एक धक्कादायक घटना समोर आलीय.अवघ्या 14 वर्षाच्या शाळकरी मुलाने रिव्हॉल्वर मधून डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली आहे. आत्महत्येच कारण समजू शकले नाही.ही दुर्दैवी घटना माढा तालुक्यातील आढेगाव येथे आज दुपारी घडली आहे. श्रीधर गणेश नष्टे असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे.
आढेगांव येथील गणेश सदाशिव नष्टे हे सशस्त्र सीमा बल राजस्थान सेंटर येथे इंस्टेस्टर म्हणून नोकरीस आहेत. आढेगांव येथे त्यांचे वडील सदाशिव नष्टे, पत्नी सारिका,श्रीधर व श्रेयश ही दोन मुले राहतात. गणेश नष्टे यांच्याकडे परवाना असलेले रिव्हॉल्व्हर असून ते जेंव्हा गावाकडे येतात तेंव्हा रिव्हॉल्व्हर त्यांच्याकडे असते. आज दुपारी साडेबारा वाजण्यापूर्वी घरातील दुसऱ्या मजल्यावरील खोलीमध्ये त्यांचा मुलगा श्रीधर गणेश नष्टे याने वडीलांच्या रिव्हॉल्व्हर मधून डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली. श्रीधर नष्टे याने आत्महत्या कोणत्या कारणास्तव केली हे समजू शकले नाही. या घटनेची टेंभुर्णी पोलीस ठाण्यामध्ये नोंद करण्यात आली आहे.

## 795 ग्रामपंचायतीचे विकासाकडे दुर्लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पंढरपूर :** ग्रामीण भागातील गावांचा विकास करण्यासाठी केंद्र व राज्य शासन कोट्यावधी रुपयाचा निधी देत आहे. आता ग्रामपंचायतच्या कामाकडे केंद्र व राज्य शासनाने लक्ष केंद्रित केले असून ग्रामपंचायतींना विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात 1024 ग्रामपंचायती आहेत. यातील 795 ग्रामपंचायतीने अद्याप विकास आराखडा तयार केला नाही. यामुळे त्या ग्रामपंचायतींना विकास आराखडा सादर करा अन्यथा कारवाई करण्यात येईल असा इशारा जिल्हा परिषदेने दिला आहे. यामुळे ग्रामपंचायतीमध्ये खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायतीकडे विकास करण्यासाठी निधी नसल्यामुळे अनेक ग्रामपंचायती नागरिकांना सोयी-सुविधा देत नाहीत. यामुळे ग्रामीण भागाकडे केंद्र व राज्य शासनाने लक्ष केंद्रित केले असून नागरिकांना पाणी, रस्ता, आरोग्य, वीज, शिक्षण या मूलभूत सुविधा मिळाव्यात म्हणून कोट्यावधीचा निधी ग्रामपंचायतींना दिला जात आहे. तरीही सरपंच व ग्रामसेवक मनमानी कारभार करत असून नागरिकांना सुविधा पासून वंचित ठेवले जात आहे. ग्रामपंचायतीमध्ये होत असलेल्या विविध विकास कामाची पाहणी ग्रामपंचायत राजकडून केली जाते. यामध्ये अनेक गावाने 26 सुविधा दिल्या नसल्याचे दिसून आले आहे. यामुळे याची गंभीर दखल केंद्र व राज्य शासनाने घेतली असून आता ग्रामपंचायतींना विकास आराखडा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सोलापूर जिल्ह्यात 1024 ग्रामपंचायत आहेत. त्यांना विकास आराखडा ई-ग्राम पोर्टलवर अपलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे 138 ग्रामपंचायती ॲक्टिव्हेट आहेत तर 91 ग्रामपंचायतीने आराखडे भरले आहेत. अद्याप 795 » पान ३ वर



## अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांचा सत्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर येथील अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांना भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांच्या अक्कलकोट रोड येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, आमदार देवेंद्र कोठे, माजी सभागृह नेते श्रीनिवास करली आदी उपस्थित होते.

## सरगम चौक ते कॉलेज चौक वाहतूक मार्गात बदल करण्याची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** सरगम चौक ते कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय यादरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. यामुळे रस्त्याच्या एकाच बाजूने दुहेरी वाहतूक सुरू आहे. यामुळे सारखी वाहतुकीची कोंडी होत आहे. यामुळे वाहनचालक नागरिक विद्यार्थी यांना त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे या वाहतूक मार्गात बदल करण्यात यावा अशी मागणी होत आहे. पंढरपूर-आळंदी पालखी मार्गाचे काम 90 टक्के पूर्ण झाले आहे. सरगम चौक ते कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय या दरम्यानचे रस्त्याचे काम राहिले आहे. यामुळे याचे काम गेल्या काही दिवसापासून सुरू करण्यात आले आहे. या मार्गावर नेहमीच वाहनांची नागरिकांची व विद्यार्थ्यांची गर्दी असते. रस्त्याचे काम सुरू केल्यामुळे एकाच बाजूने दुहेरी वाहतूक सुरू आहे. यामुळे रस्त्यावर वाहतुकीची प्रचंड कोंडी होऊन नागरिक, वाहन चालकांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे. यामुळे या मार्गावरील वाहतूक मार्गात बदल करावा अशी मागणी होत आहे. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयास जाण्यासाठी दररोज हजारो विद्यार्थी जातात. याच परिसरातून वाहने जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

## पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत गुरुवारी जिल्हा नियोजन मंडळाची बैठक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध विकास कामे करण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाकडून निधी दिला जातो. मात्र अनेक गावात कामे केली नसल्याचे आढळून आले आहे. जिल्हा नियोजन मंडळाची बैठक पालकमंत्री जयकुमार गोरे गुरुवारी 30 जानेवारी रोजी घेणार आहेत. या बैठकीत सत्ताधारी व विरोधकात खडाजंगी होणार असल्याची चर्चा होत आहे.
ग्रामीण भागात विविध विकासकामे करण्यासाठी राज्य व केंद्र सरकारकडून जिल्हा नियोजन मंडळाला कोट्यावधी रुपयाचा निधी दिला जातो. या निधीतून वीज, रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण अशा सुविधा नागरिकांना दिल्या जातात. मात्र अनेक गावात विकासाची कामे झाली नसल्याच्या तक्रारी झाल्या आहेत. अधिकाऱ्यांनी फक्त कागदपत्रावरच कामे दाखविली आहेत. यामुळे नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे. सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी जयकुमार गोरे यांची निवड करण्यात आली आहे. गोरे हे गुरुवार 30 जानेवारी रोजी जिल्हा नियोजनाची बैठक घेणार असून यामध्ये अधिकाऱ्यांकडून कोणकोणती कामे केली आहेत व कोणकोणती कामे करावयाची आहेत याचा आढावा घेणार आहेत. या बैठकीस खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार नारायण आबा पाटील हे विरोधी लोकप्रतिनिधी सत्ताधाऱ्यांना घेणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. यामुळे 30 जानेवारी रोजी होणाऱ्या जिल्हा नियोजनाच्या बैठकीकडे लक्ष लागले आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे या बैठकीत कोणता निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे.

## आनंद काशीद यांचा वैकुंठ स्नानाद्वारे सरकारचा निषेध

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** मराठा समाजाला ओबीसी आरक्षण मिळावे, या मागणीसाठी उपोषण करणारे आनंद काशीद यांनी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी वैकुंठ स्नान करत सरकारचा तीव्र निषेध केला. काशीद यांनी सरकारच्या निष्क्रियतेवर नाराजी व्यक्त करत, "मराठा समाजाच्या आरक्षणासाठी वर्षभरापूर्वी दिलेली आश्वासने सरकारने पाळलेली नाहीत. आता आरक्षण मिळाल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही," असे ठामपणे सांगितले. काशीद यांच्या या कृतीमुळे स्थानिक स्तरावर आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळत असून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

## दर्शन

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** -केंद्रीय संचार, पूर्वोत्तर क्षेत्र विकास मंत्री जोतिरादित्य सिंधिया यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले. याप्रसंगी मान्यवर उपस्थित होते.

## At a Glance

### पावणेसात लाख रुपयांच्या दागिन्यांची केली चोरी

**सोलापूर :** सोलापुरातील ध्रुव





हॉटेलसमोरील पटवर्धन चौकातील पु. ना. गाडगीळ ज्वेलर्समधील 6 लाख 87 हजारांच्या दागिन्यांची चोरी करून फसवणूक केल्याबद्दल त्याच दुकानातील सुपरवायझरविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत ज्वेलर्सचे व्यवस्थापक राहुल बाकळे ( रा. भवानी पेठ, सोलापूर ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुपरवायझर राजकुमार बिराजदार ( रा. सोलापूर ) याच्याविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार 23 जानेवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडला.

### अर्धा किलोमीटरवरून एसटी नेली ढकलत

**पंढरपूर :** पंढरपूर शहरातील नव्या



बसस्थानकांमधून निघालेली आटपाडी आगाराची एसटी बस जुन्या बसस्थानकासमोर येताच रस्त्यावरच बंद पडली. रहदारीच्या मार्गावर, पोलीस ठाण्यासमोर रस्त्यावर बंद पडलेली बस परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी अक्षरशः धक्का मारत बसस्थानकात ढकलून नेली. या दरम्यान सुमारे अर्धा तास जुने बस स्थानक ते नवीन बस स्थानक या दरम्यान, आणि शहर पोलीस ठाण्यासमोर वाहतुकीची कोंडी झाली होती. कमालीच्या नादुरुस्त आहेत, दररोज अनेक बसेस वेळेवर देखभाल न केल्यामुळे रस्त्यावर कुठेही बंद पडल्याचे दिसून येतात.

### निवडणूक आयोगा-कडून भाजपचे काम

**सोलापूर :** बॅलेट पेपरवर



निवडणुकीसाठी लढणार निवडणूक आयोग जोपर्यंत बॅलेट पेपरवर निवडणुका घेत नाही, तोपर्यंत काँग्रेस पक्ष लढणार आहे. लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर ईव्हीएम बंद केल्या पाहिजेत. अन्यथा एक दिवस दबावतंत्रांचा वापर करुन नागरिकांचे अधिकार काढून घेण्यात येतील, असे खा. शिंदे यांनी सांगितले. भाजपचे काम केल्याचा आरोप खा. प्रणिती शिंदे यांनी केला आहे. तसेच सर्व निवडणुका या पारदर्शक झाल्या पाहिजेत, अशी मागणी त्यांनी केली.

### नदीत दूषित पाणी सोडणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी

**माळशिरस :** अकलूज आणि पुरंदावडे गावच्या हद्दीत असलेल्या ओढ्यातून नीरा नदीत येणाऱ्या दूषित पाण्याची चौकशी करून दूषित पाणी सोडणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र विकास सेना पक्षाचे प्रदेश सचिव अनिल साठी यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी सोलापूर, उपप्रादेशिक प्रदूषण नियंत्रण अधिकारी सोलापूर, यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## डॉ. अनिल जोशी यांच्या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ साजरा

## इच्छा मरणाच्या कायद्याचा आर्तस्वर उमटला वक्त्यांच्या मुखात !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पंढरपूर :** अलिकडे वैद्यकीय व्यवसायापुढे अनेक महत्वाचे प्रश्न असतानाच जन्म आणि मृत्यु या दोन बिंदूच्या संदर्भात चिकित्सक प्रश्न निर्माण झाले आहेत. याला एक वेगळा मुलामा दिला जातो. पण समाजहिताच्या दृष्टीने ते कितपत सत्य आहे याचा विचार होणे गरजेचे आहे असे मत महाराष्ट्रातील ज्येष्ठ अतिदक्षता विभागाचे तज्ञ डॉ. शिरीष प्रयाग यांनी रविवारी झालेल्या पुस्तक प्रकाशन समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना व्यक्त केले.

पंढरपूरातील एक सव्यसाची वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल जोशी लिखित " शेवटचा दिस गोड व्हावा " व "(अ) पार्थिव" दुसऱ्या आवृतीच्या प्रकाशन समारंभात आरती मंडप प्रांगण येथे बोलताना व्यक्त केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध लेखक आणि संपादक भानू काळे होते.

पंढरपूरातील नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात अव्याहत काम करुन स्वतःची वैद्यकीय सेवेची एक वेगळी ओळख निर्माण करुन देणारे डॉ. अनिल जोशी यांच्या या दोन पुस्तक प्रकाशनाने समारंभाला उपस्थित असलेल्या शेकडो विविध व्यवसायातील श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारा अनुभव आला. प्रारंभी लेखक अनिल जोशी यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात, आज समाज जीवनात वृद्धांचा जटील प्रश्न निर्माण झाल्याने त्याचा परिणाम समाज जीवनात विपरित होत असल्याचे दिसून येते. आज असंख्य नवशिक्षित परदेशगमन करत असल्याने कुटुंबातील वृद्धांचे » पान ३ वर

## पालकमंत्र्यांनी मनपा आयुक्तांचे केले कौतुक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मनपा आयुक्त शीतल तेली यांनी पुढाकार घेऊन महिला कर्मचाऱ्यांमार्फत चालविण्यात येणारा पेट्रोल पंप आज जो सुरु केला आहे, हा एक आदर्श उपक्रम आहे. महाराष्ट्रातील हे एकमेव उदाहरण आहे, ज्याचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे, अशा शब्दात सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मनपा आयुक्तांचे कौतुक केले. सोलापूर मनपा निर्मित पेट्रोल पंपाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. इंडियन ऑइल व सोलापूर मनपा मार्फत चालविण्यात येणाऱ्या पेट्रोल पंपाचा शुभारंभ गोरे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

## केंद्रीय संचार मंत्री जोतिरादित्य सिंधिया यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** केंद्रीय संचार, पूर्वोत्तर क्षेत्र विकास मंत्री जोतिरादित्य सिंधिया यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले.यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते केंद्रीय मंत्री जोतिरादित्य सिंधिया यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले , तहसीलदार सचिन लंगुटे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, पोस्टमास्तर जनरल पुणे रिजन रामचंद्र जायभाये,अधीक्षक डाक घर चंद्रकांत भोर यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## रिटेवाडी उपसा सिंचनसंदर्भात 3 फेब्रुवारीला बैठक

**करमाळा :** करमाळा तालुक्यातील प्रस्तावित रिटेवाडी उपसा सिंचन योजनेबाबत मुंबईत सह्याद्री अतिथीगृह येथे ३ फेब्रुवारीला बैठक होणार आहे. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या संदर्भात या आधी बैठक घेतली होती. आता जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे, अशी माहिती शिवसेनेचे (शिंदे गट) जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली आहे. चिवटे म्हणाले, रिटेवाडी उपसासिंचन योजनेचा प्रश्न मांडून त्याचा पाठपुरावा केला होता. शिवसेनेच्या या प्रयत्नाला आता यश येत असल्याचे दिसून येत आहे.

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडगाव शिर्पनहळ्ळी ग्राम पंचायतीच्या सरपंच रूपाली प्रशांत लोहार यांना विभागीय आयुक्त पुणे यांनी अपात्र कलेल्या निकालास ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी पुढील सुनावणीपर्यंत तात्पुरती स्थगिती दिली आहे. त्यामुळे लोहार या वडगाव शिर्पनहळ्ळी ग्रामपंचायतच्या सरपंच पदी पुन्हा विराजमान झाल्या आहेत. रूपाली लोहार यांच्या विरुद्ध सिद्धाराम बिराजदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने सुनावणी होऊन त्यामध्ये सरपंचांना त्यांच्या उर्वरित कालावधी करिता सरपंच व सदस्यांनी पदावरून काढून टाकले होते.

### प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत चेअरमन संजय आवताडे यांच्याकडून कर्मचाऱ्यांना भेट

# आवताडे शुगरच्या कर्मचाऱ्यांना वेतन वाढ

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क





**मंगळवेढा :** आवताडे शुगर या कारखान्यांच्या माध्यमातून आजपर्यंत शेतकऱ्यांची सेवा केल्याचा मला अभिमान आहे. आपण केवळ आर्थिक प्रगतीकडे लक्ष केंद्रित न करता सामाजिक जबाबदारीही पार पाडत आहोत. प्रत्येकाने आपल्या कार्यातून सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आपल्या कारखान्याने मागील वर्षी 4 लाख 4 हजार 484 मे. टन गाळप करून 3 लाख 79 हजार 200 क्विंटल साखर उत्पादित केलेली आहे. त्याच बरोबर चालू हंगामात आपल्या कारखान्याने आजपर्यंत 66 दिवसात 2 लाख 66 हजार 740 मे. टन इतके गाळप करून साखर 2 लाख 58 हजार 200 क्विंटल साखर उत्पादित केलेली असून सरासरी साखर उतारा 10.00 % इतका आहे. याही वर्षी आपले सर्व कर्मचारी आपण दिलेले उद्दीष्ट पूर्ण करतील हा माझा विश्वास आहे. कर्मचाऱ्यांनी प्रामाणिक योगदान दिल्यामुळेच कारखानदारी यशस्वी होत असून त्या कर्मचाऱ्यांचेही सुखदुःख पाहणे आमचे कर्तव्य आहे, त्यामुळे आज प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून कर्मचाऱ्यांना वेतन वाढ करत असल्याचे अवताडे शुगरचे चेअरमन संजय आवताडे यांनी ध्वजवंदनानंतर बोलताना जाहीर केले.

संजय आवताडे पुढे म्हणाले की, आज आपण या ठिकाणी 26 जानेवारी 2025 रोजी 76 वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी एकत्र जमलेलो आहोत. 15 ऑगस्ट 1947 रोजी आपल्या देशाने स्वातंत्र्य मिळवले आणि त्यानंतर 26 जानेवारी 1950 रोजी आपण प्रजासत्ताक बनलो. हा दिवस भारताच्या इतिहासात अतिशय महत्त्वाचा आहे कारण, या दिवशी आपल्या संविधानाची अंमलबजावणी करण्यात आली. आपल्या संविधानाने आपल्या देशाला लोकशाही, न्याय, समता आणि स्वातंत्र्य यांची शिकवण दिली आहे.

आपले आमदार समाधान आवताडे यांचे मार्गदर्शनाखाली कारखान्याचे कामकाज अतिशय योग्य व चांगल्या प्रकारे चालू असून, आपल्या कारखान्याचा उद्देश फक्त आर्थिक प्रगती करणे नाही, तर आपल्या सर्व कामगार बंधू, शेतकरी वर्ग यांचे जीवनमान उंचावणे असून त्या दृष्टीने आपण खालील प्रमाणे यापूर्वी कामगाराना वेतन वाढ दिलेली आहे.दैनिक वेतनावर कामा करणाऱ्या कामगारास जून 2024 पासून हंगाम 2022-23 मध्ये रुजू झालेल्यांना रु.2000 व 2023-24 मध्ये कामावर हजर झालेल्यांना रु.1750 प्रमाणे वेतन वाढ देण्यात आली आहे. तसेच हंगामी कामगारासही नोव्हेंबर २०२४ पासून हंगाम 2022-23 मध्ये रुजू झालेल्यांना रु.2000 व हंगाम 2023-24 मध्ये रुजू झालेल्यांना रु.1500 प्रमाणे वेतन वाढ दिलेली आहे. त्याच बरोबर आज प्रजासताक दिनाचे औचित्य साधून, कायम सेवेतील कामगारासाठी माहे जानेवारी २०२५ पासून हंगाम 2022-23 मध्ये कामावर हजर झालेल्यांना 10 %, हंगाम 2023-24 मधील कामगारास 7.5 % व हंगाम 2024-25 मधील कामगारास 5 % वेतन वाढ देण्यात येईल.आपण एकजुटीने काम करून आपल्या कारखान्याला अधिक प्रगत बनवू या असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, भारत निकम, जनरल मॅनेजर (टेक्निकल) सुहास शिनगारे, मोहन पवार, संभाजी फाळके, बजिरंग जाधव, राहुल नगणे, तोहिद शेख, दामोदर रेवे, अभिजित पवार, चंद्रकांत राठोड, रणजीत पवार, सुधाकर पाटील, रणजीत रणदिवे, अमोल शिंदे, सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, कर्मचारी बंधु व उपस्थीत होते.

## मारहाण प्रकरणी 11 जणांविरुद्ध गुन्हा नोंद



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराणा प्रताप नगर येथील राहत्या घराजवळ मागील भांडणाचा राग मनात धरून तिघांना बेदम मारहाण केल्याप्रकरणी 11 जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मारहाणीची ही घटना 22 जानेवारी रोजी रात्री अकरा वाजता घडली. फिर्यादी विनायक दीपक पंतूवाले (वय 22 राहणार महाराणा प्रताप नगर झोपडपट्टी ) याचे वडील, चुलत बहिण, भाऊ यांना बेदम मारहाण करून जखमी केले. तसेच सुनीता पंतूवाले व काकू छाया पंतूवाले यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. शिवीगाळ करीत दमदाटी केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

» Selected

## महाराष्ट्र वि. त्रिपुरा रणजी सामना होणार सोलापूरात



**सोलापूर :** सोलापूर येथील प्रसिद्ध इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर येत्या ३० जानेवारी पासून महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा संघात रणजी ट्रॉफीचा सामना होणार असल्याचे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने सांगण्यात आले. या सामन्यात भारतीय खेळाडू ऋतुराज गायकवाड तसेच आयपीएल मधील काही प्रसिध्द खेळाडू खेळणार आहेत. बीसीसीआय तर्फे आयोजित रणजी ट्रॉफी स्पर्धेतील साखळी फेरीचा शेवटचा सामना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्यावतीने आयोजनाची संधी सोलापूरला देण्यात आली आहे. या सामन्यासाठी विविध नियोजन समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

## अरिहंत पब्लिक स्कूलमध्ये अटारी वाघा बॉर्डर सीमा देखावा...

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** येथील अरिहंत पब्लिक स्कूलमध्ये भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गिरीश बेणारे उपस्थित होते. यावेळी शाळेचे विविध पदावर कार्यरत असणारे माजी विद्यार्थी यामध्ये प्रामुख्याने कु. नेहा रंगम, डॉ. सौ. स्नेहा रोंगे, कु. ऋचा बेणारे, शुभम गांधी, डॉ. अदिती परिचारक, कु. पूजा खपाले व सौ. रश्मी राका आदी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झेंडावंदनाचा कार्यक्रम जोश पूर्ण वातावरणात साजरा झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, योगा, मानवी मनोरे नृत्य, लाठीकाठी, तलवारबाजी आधी साहसी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले ते स्टेट बोर्ड च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले अटारी वाघा बॉर्डर रिट्रीट सेरेमनी. यामध्ये विद्यार्थ्यांना भारत आणि पाकिस्तान यांच्याकडून एकमेकांना दिले जाणारे आव्हानात्मक मानवंदना, उत्साही स्पर्धात्मक परेड, घोषणा यांचे चित्तथरारक सादरीकरण केले. सदर कार्यक्रमाचे सादरीकरण प्रथमच पहात असल्याच्या प्रतिक्रिया पालकांकडून मिळाल्या. सदर प्रात्यक्षिकाच्या तयारीसाठी प्रशालेचे माजी क्रीडा शिक्षक श्री रवींद्र ओव्हाळ व सौ. मंजिरी जोशी यांनी मार्गदर्शन केले.यानंतर खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शितल के शहा, सचिव मा.उज्वल दोशी , खजिनदार मा. मिलिंद शहा सर, सीबीएसई विभागाच्या प्राचार्या मा. सुप्रिया बहिरट व स्टेट विभागाच्या मुख्याध्यापिका मा. पद्मा लोखंडे मॅडम उपस्थित होते. याबरोबरच सर्व शिक्षक कर्मचारी विद्यार्थी व पालक यांच्या उत्साहपूर्ण उपस्थितीत सदर सोहळा संपन्न झाला.

## अर्थसहाय्य मंजूर...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या प्रयत्नाने पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी व मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ११ गरजू रुग्णांना उपचारासाठी एकूण २१,००,०००/- (एकवीस लाख) रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. याप्रसंगी खा. शिंदे यांच्यासमवेत ११ गरजू रुग्ण दिसत आहेत.

## तालुक्यातील विविध समस्यासंदर्भात प्रांताधिकारी यांना निवेदन



**पंढरपूर :** पंढरपुर येथील उपविभागीय कार्यालया मध्ये तालुक्यातील शेतकरी व इतर लोकांच्या शेतीच्या बांधाच्या . रस्त्याच्या . मालकी हक्काच्या आदी वाद विवादाच्या केसेसच्या तारखा चालवण्यात येत आसतात . त्याबाबत बऱ्याच वेळा तारखा न चालता बोर्डावर पुढील तारीख उशीरा दिली जाते. पन्नास ते शंभर कि. मि. वरुन तारखेला लोक सकाळ पासुन येतात त्यात बरेच वृद्ध लोक असतात त्यांचे बाहेर बसुन हाल होतात ज्या दिवशी तारीख चालणार नाही. त्या वेळी लोकांचा हेलपाटा वाचण्यासाठी तारखे आगोदर कळविल्यास तालुक्यातुन येणार्या लोकांचे हेलपाटे व त्रास वाचतील या साठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत या साठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने प्रांत साहेबांना लेखी निवेदन देवून या समस्येवर उपाय योजना करण्याची मागणी शिवसेना जिल्हासंपर्कप्रमुख अनिल कोकीळसाहेब जिल्हाप्रमुख संभाजीराजे शिंदे यांच्या मार्गदर्शनातून तालुकाप्रमुख बंडू घोडके जेष्ठ शिवसैनिक काकासाहेब बुराडे यांनी प्रांत अधिकाऱ्यां कडे निवेदन देवून केली आहे या वेळी उपतालुकाप्रमुख संजय घडके नामदेव चव्हाण समाधान गोरे भारत कदम जीवन चव्हाण आदी शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.

# विविध ठिकाणी भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शासकीय ध्वजारोहण**

**पंढरपूर :** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या 75 व्या वर्धापन दिनी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले.



शासकीय ध्वजारोहण यांच्या हस्ते संपन्न झाले उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, पोलीस निरिक्षक विश्वजित घोडके आदी.

रेल्वे मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या या शासकीय सोहळ्यात एकूण 32 पथकांनी सहभाग घेतला होता. यावेळी पोलीस, गृहरक्षक दल, एनसीसी, स्काऊट तसेच शहरातील विविध विद्यालयाच्या विध्यार्थी-विद्यार्थ्यीनी यांच्या पथकाने केलेल्या संचलनाचे प्रांताधिकारी श्री. इथापे यांनी निरिक्षण करुन मानवंदना स्विकारली.

शासकीय ध्वजारोहण समारंभास माजी आमदार प्रशांत परिचारक, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, पोलीस निरिक्षक विश्वजित घोडके, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, विजयकुमार जाधव, वैभव बुचके, उप कार्यकारी अभियंता भिमाशंकर मेटकरी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले यांच्यासह स्वांतत्र्यसैनिक, पदाधिकारी, शासकीय अधिकारी- कर्मचारी, तसेच मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संविधान उद्देशिकाचे वाचन करुन उपस्थितांना ध्वज प्रतिज्ञा देण्यात आली व उपस्थितांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. तसेच पोलीस दलाच्या वतीने ध्वजास मानवंदना देण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी इथापे यांच्या हस्ते सहभागी पथकांना प्रमाणपत्र आणि मानचिन्ह देण्यात आले.

**कर्मयोगी इन्स्टिट्यूट मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न**

२६ जानेवारी २०२५ रोजी कर्मयोगी इन्स्टिट्यूटऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालय शेळवे येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस पी पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. एस पी पाटील यांनी भारतीय प्रजासत्ताक दिनाचे महत्व विषद केले. तसेच हा दिवस म्हणजे स्वतंत्र भारतासाठी बलिदान देणाऱ्या सर्वांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्वल भविष्य आहेत आणी म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपली जबाबदारी ओळखून भारताला आत्मनिर्भर बनविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावे असे सांगून त्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या सर्वाना हार्दिक शुभेच्छा दिल्या.



पंढरपूर- उमा महाविद्यालय पंढरपूर मध्ये 26 जानेवारी रोजी ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

श्री पांडुरंग प्रतिष्ठान चे विश्वस्त श्री. रोहन परिचारक यांनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस पी पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए बी कणसे, नर्सिंग कॉलेज चे प्राचार्य प्रा. गुरुराज कुलकर्णी,फार्मसी कॉलेज चे प्राचार्य प्रा. एस एम जाधव, ज्युनिअर कॉलेज चे प्राचार्या प्रा. एम आर शिंदे, रजीस्ट्रार श्री. जी डी वाळके तसेच डिग्री अभियांत्रिकी,पॉलिटेक्निक, नर्सिंग, फार्मसी, ज्युनिअर कॉलेज चे सर्व विद्यार्थी, विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.

**उमा महाविद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा**

पंढरपूर- उमा महाविद्यालय पंढरपूर मध्ये 26 जानेवारी रोजी ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला निवृत्त कर्नल "स्वराज्यरक्षक सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड" चे संस्थापक हरीभाऊ लक्ष्मण बोंगे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष मुकुंदराव परिचारक,संस्थेचे सचिव राजगोपालजी भट्टड, संस्थेचे विश्वस्त युवानेते प्रणवजी परिचारक, संस्थेचे विश्वस्त उमा शिक्षण संकुलाचे कार्यवाह माजी प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक, रमेश लाड सन्माननीय सदस्य तसेच उमा महाविद्यालयाचे प्राचार्य

डॉ. धीरजकुमार बाड उपस्थित होते. तसेच उमा शिक्षण संकुलातील प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्वेरीमध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा**

पंढरपूर - गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या भव्य प्रांगणात भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एम. पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. भारतमातेच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाला सुरवात झाली. स्वेरीचे विद्यार्थी अनुजा शिरगुर, वेदांत देशमुख, पियुष चोपडे व साक्षी शिंदे यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त केलेल्या भाषणांतून भारतातील विविध क्षेत्रातील वस्तुस्थिती, युवकांवरील जबाबदारी, भारतीय संस्कृती, शिक्षण, आरोग्य, क्रीडा आदी विषयावर उत्तम पद्धतीने विचार मांडले. डिप्लोमा च्या विद्यार्थिनी सानिया भंडारे यांनी 'ओ देश मेरे तेरी शान पे सदके... व एमबीए च्या विद्यार्थिनी शेल्विका बोडयाल यांनी 'ए मेरे वतन के लोगो, जरा याद करो कुर्बानी .....' हे देशप्रेमी गीत सुमधुर आणि अप्रतिम सुरात गायले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अधिष्ठाता डॉ. पी.एम. पवार म्हणाले कि, 'आजच्या युवकांसमोर देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने अनेक आव्हाने आहेत. आज स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षानंतरही आपण विज्ञान तंत्रज्ञानाच्या स्वयंपूर्ण नाही. त्यासाठी आपल्याला पाश्चात्य व इतर देशांवर अवलंबून राहावे लागते. आजच्या तरुणांनी आपल्या अभ्यासातून आणि संशोधनातून हे परावलंबित्व कमी केले पाहिजे.' प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध विभागांच्या संशोधन पत्रिकांचे व 'स्वेरीयन' या त्रैमासिकाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन. डी.मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस.मठपती, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, रजिस्ट्रार राजेंद्र झरकर, बालाजी सुरवसे, अमोल चंदनशिवे, शिक्षकेतर कर्मचारी व चारही महाविद्यालयांचे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिक्षा गुन्नुर, ट्विंकल कदम व प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी केले तर मिठाई वाटपाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



पंढरपूर - स्वेरीत भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एम. पवार आदी.

**श्रीराम शिक्षण संस्थेमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा**

माळशिरस- श्रीराम शिक्षण संस्था पानीव मध्ये देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला जो असंख्य भारतीयांसाठी एक अभिमानाचा दिवस आहे. हा तोच दिवस जेव्हा भारत देश जगभरात प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित झाला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाहिद मेजर कुणाल गोसावी यांच्या मातोश्री वृंदादेवी गोसावी राहणार पंढरपूर तर अध्यक्ष पदी प्रकाश पाटील हे होते.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.यानंतर अमर जवान स्मृतिचिन्ह देऊन वृंदादेवी गोसावी यांचा श्रीराम परिवारातर्फे गौरव करण्यात आला.आकांशा निकम यांचा सत्कार करण्यात आला. विविध विभागामधून ज्या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले अशा गुणवंत विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला व शिक्षकांचा गौरव करण्यात आला.प्रमुख पाहुण्यांनी देशभक्ती पर भाषण दिले भारत स्वातंत्र लढ्यात बलिदान दिलेल्या क्रांतिकारकांचे,नेत्यांचे स्मरण करून प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि सैन्यदलात देशाची सेवा करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी यावेळी बोलताना म्हणाले की,विविध समाज सुधारकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता इतिहास घडवला तो वारसा टिकवण्याचे काम आजच्या विद्यार्थ्यांनी केले पाहिजे.मोबाइल चा वापर नियंत्रनात असावा आणि विद्यार्थ्यांनी आदर्श नागरिक होणे महत्वाचे आहे असा संदेश आपल्या मनोगतातून दिला.

या कार्यक्रमास अध्यक्ष प्रकाश पाटील, उपाध्यक्ष करण पाटील, मार्गदर्शिका सौ.श्रीलेखा पाटील, सचिव अ‍ॅड. अभिषेक पाटील,सहसचिव डॉ. समीर पवार,विशेष कार्यकारी अधिकारी विनोद बाबर,भाऊसाहेब वणवे,दिनेश शिंदे,प्रमोद झगडे संस्थेतील सर्व विभागाचे प्राचार्य ,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थिती होते. सूत्रसंचालन वैशाली जाधव आणि सुवर्णा ठवरे ,आभार सोमनाथ डावरे यांनी केले.



माळशिरस- श्रीराम शिक्षण संस्था पानीव मध्ये देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पंढरपूर येथील शाहिद मेजर कुणाल गोसावी यांच्या मातोश्री वृंदादेवी गोसावी यांचा सत्कार संस्थाध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

**सोलापूर :** हैद्राबाद महामार्गावर बोरामणी गावाजवळ झालेल्या अपघातात ज्येष्ठ नागरिक ठार झाल्याची घटना शुक्रवारी घडली आहे. चांद चमन मुजावर ( वय 65, रा. बोरामणी ) असे मरण पावलेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. मुजावर हे सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून सोलापूरकडे येत होते. त्यावेळी यशराज हॉटेलजवळ पाठीमागून येणाऱ्या चारचाकी वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. त्यात ते गंभीर जखमी झाल्याने त्यांना बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी भाऊ दाऊद मुजावर यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.

## माघी यात्रेत अधिकाऱ्यांनी समन्वय ठेवून काम करावे

# भाविकांच्या आरोग्य व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे - प्रांताधिकारी सचिन इथापे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** माघ शुध्द एकादशी शनिवार दि. 08 फेब्रुवारी 2025 रोजी असून, या यात्रेचा कालावधी 03 ते 12 फेब्रुवारी असा आहे. या यात्रा कालावधीत श्री. विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येणाऱ्या भाविकांच्या आरोग्य, स्वछतेला प्राधान्य देवून आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच सर्व विभागांनी सोपविलेल्या कामांची जबाबदारी चोखपणे पार पाडावी अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या .

माघ वारी पुर्व नियोजनाबाबत प्रांत कार्यालय पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.महेश सुडके, मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, न.पाचे अभियंता श्री. पवार, महावितरणचे कार्यकारी अभियंता श्री. भोळे, यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले म्हणाले, यात्रा कालावधीत नगरपालिकेने शुध्द व पुरेशा पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, नदीपात्रातील वाळवंटाची व घाटाची स्वच्छता करावी, 65 एकर व व नदीपात्रात तात्पुरते शौचालयाचे उभारणीचे नियोजन करावे. 65 एकरमध्ये भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पुरेसा वीजपुरवठा आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. शहरातील प्रमुख रस्ते अतिक्रमणमुक्त करावेत. आरोग्य विभागाने यात्रा कालावधीत पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवावा. नदी पात्रात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध राहील याबाबत पाटबंधारे विभागाने नियोजन करावे. मंदिरालगत विक्रीसाठी बसणाऱ्या पथविक्रेत्यांवर मंदिर, पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी. अन्न व औषध प्रशासन विभागाने खाद्यपदार्थांच्या दुकानांची तपासणी करण्यासाठी पथके नेमावीत अशा सूचनाही प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

मंदीर समितीच्या वतीने पत्रा शेड, दर्शन रांग, दर्शन मंडप या ठिकाणी पिण्याचे पाणी, शौचालये, विश्रांती कक्ष, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच दि. 7 ते 9 फेब्रुवारी या कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना मोफत चहा, नाष्टा व भोजन व्यवस्था करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

यात्रा कालावधीत वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी तसेच भाविकांना सुरक्षेबाबत कोणतेही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केले असल्याचे उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी सांगितले.यावेळी नगरपालिका प्रशासनाकडून वारी कालावधीत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा, स्वच्छता, तात्पुरते शौचालय, कचरा व्यवस्थापन, जंतनाशक फवारणी आदी बाबबतची माहिती मुख्याधिकारी प्रशांत यांनी दिली. यावेळी अन्न-औषध प्रशासन, परिवहन, महावितरण, आरोग्य आदी विभागांचा आढावा घेण्यात आला.

## धमकी देत शेतकऱ्याच्या जमिनीवर कब्जा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** मंगळवेढा तालुक्यातील गोणेवाडी येथील शेतकरी नवनाथ प्रकाश व्हरे या शेतकऱ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष रामेश्वर मासाळ यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देऊन जबरदस्तीने दोन एकर शेत जमीन खरेदी केल्याचा आरोप व्हरे कुटुंबाने केला आहे. या घटनेनंतर मोठी खळबळ उडाली आहे. सोलापुरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रामेश्वर मासाळ यांनी शेतकरी नवनाथ व्हरे यांना व त्यांचे वडील प्रकाश व्हरे यांना मारहाण करून 16 जानेवारी रोजी दोन एकर शेत जमीन खरेदी केली आहे. याबाबत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

» पान १ वरुन

## 795 ग्रामपंचायतीचे विकासाकडे....

ग्रामपंचायतीने विकास आराखड्याकडे दुर्लक्ष केले आहे. यामुळे जिल्हा परिषदेने या ग्रामपंचायतींना दोन ग्रामसभा घेऊन यामध्ये नागरिकांची मते घेऊन विकास आराखडा सादर करावा. 31 जानेवारीपर्यंत सर्व ग्रामपंचायतींने विकास आराखडा सादर करावा अन्यथा कारवाई करण्यात येईल असा इशारा जिल्हा परिषदेने दिला आहे. यामुळे ग्रामपंचायतींमध्ये खळबळ उडाली आहे. प्रत्येक गावातील ग्रामपंचायतीमध्ये राजकारण केले जाते. गटातटाचे राजकारण होत असल्यामुळे विकासापासून नागरिकांना वंचित रहावे लागत आहे. यामुळे आता याची दखल केंद्र व राज्य शासनाने घेतली असून गावात गटातटाचे राजकारण न होता नागरिकांना विकासाच्या कामाची गरज असल्याने ही कामे होणे गरजेचे आहे. याकडे लक्ष केंद्रित केले असून सरपंच, ग्रामसेवक यांना सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे आता ग्रामपंचायत चा विकास होणार आहे.

## इच्छा मरणाच्या कायद्याचा आर्तस्वर...

प्रश्न जटील बनत चालले आहेत. वैद्यकीय उपचाराबाबत वृद्धांचे मृत्यु कशाप्रकारे होऊ शकतात याचे सखोल विवेचन करुन ते पुढे म्हणाले, इच्छा मरणाची कायदेशीर प्रक्रिया तशी स्पष्ट नसल्याने याबाबत सरकारनी एखादा त्वरित कायदा करावा याबद्दलचे प्रयत्न थोड्या फार प्रमाणात होताना दिसतात. इच्छा मरणाबाबत अत्यंत सखोल विवेचन करुन आपल्या भाषणात डॉ. अनिल जोशी यांनी आपल्या दोन्हीही पुस्तकांचा शाब्दीकगर्भगृह उकलून दाखविला. शेवटी असाध्य आजारावर उपचार करताना निम्मे जीवन खर्ची घातलेले डॉ. अनिल जोशी एका कवितेच्या वाचनातून भाऊक झालेलेही दिसले.

आपल्या भाषणात डॉ. प्रयाग पुढे म्हणाले, मृत्यु टाळणे किंवा त्याला पुढे नेणे हे काम वैद्यकीय व्यवसायाचे आहे. हेल्थकेअर व्यवस्थेवर सविस्तर विवेचन करुन त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अतिदक्षता विभागाचे शास्त्र १९७० साली सुरु झाले. त्याचा फायदाही अनेक रुग्णांना झालेला दिसतो. परंतु अलिकडे वैद्यकीय व्यवसायातील खर्चिक उपचार पद्धती ही जाचक असली तरी इच्छा मरणाच्या संदर्भात कांहीतरी कायद्याची तरतूद होणे गरजेचे आहे.

यावेळी डॉ. प्रसन्न दाभोलकर, जेष्ठ मानसोपचार तज्ञ यांनी आपल्या भाषणात वैद्यकीय उपचार पद्धतीबाबत विशेष विश्लेषण करुन सांगितले, प्रत्येक व्यक्तीला जगण्याची इच्छा स्वाभाविक आहे. पण इच्छामरणाच्या संदर्भात अजून कोणताही कायदा होऊ शकला नाही. ६० मुस्लिम आणि कॅथेलिक देशात इच्छा मरणाचा कायदा अस्तित्वात असला तरी आपली वाढत जाणारी लोकसंख्या आणि प्रजनन प्रक्रिया यांचा वेग पाहिला तर इच्छामरण हा कायदा होणे अनेकांना होणे अपेक्षित असला तरी तो कायदा अस्तित्वात येऊ शकला नाही. आज ज्येष्ठ माणसांना सांभाळायचे कसे? हा प्रश्न अनेक कुटुंबियांच्या पुढे उभा राहिलेला आहे. याबाबतचे अधिक विश्लेषण करुन श्री.भानू काळे यांनी अनेक ग्रंथांचे दाखले देऊन वृद्धापकाळातील व्यवस्था आणि त्याअनुषंगाने निर्माण झालेला इच्छा मरणाचा विषय यावर त्यांनी सखोल विवेचन केले.

समारंभारला डॉक्टर, वकील, सामाजिक कार्यकर्ते, अध्यात्मिक क्षेत्रातील बुजुर्ग आणि जोशी कुटुंबियांनी समाज माणसात आपुलकी आणि प्रेमाची निर्माण केलेली स्नेहमैत्री यावेळी शेकडोंच्या संख्येनी उपस्थित होती. शेवटी श्री.अभय जोशी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करुन कार्यक्रमाची सांगता केली.

## सजावट...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने संपूर्ण मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. विठ्ठल-रुक्मिणी मातेला पारंपरिक वस्त्रांचा व दागिन्यांचा साज घालण्यात आला असून गळ्यात तिरंगी उपरणे घालण्यात आले आहे.

## विवेक वर्धिनी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बनविले आउटडोअर सोलर लॅम्प

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** विवेक वर्धिनी विद्यालय पंढरपूर मधील इलेक्ट्रिक टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी सोलर लॅम्प तयार केले असून एस एस सी बोर्डाच्या नियमानुसार प्रोजेक्ट वर्क म्हणून विद्यार्थ्यांनी आऊटडोर सोलर लॅम्प बनवले आहेत. यामध्ये प्राचार्य डॉ.मुंडे सर. उपमुख्याध्यापक पाटील सर. अशोक पवार सर. तंत्र विभाग प्रमुख नानासाहेब देवकाते सर. मासाळ सर.रणदिवे सर. एच .के मोरे सर. दराडे सर.व मेकॅनिकल टेक्नॉलॉजी चे निकम सर. इलेक्ट्रिक टेक्नॉलॉजी चे कांबळे सर. इत्यादी ने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तंत्र शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रोजेक्ट बनविले असून यामध्ये सुहानी आटकळे, सुप्रिया कटके, साक्षी जाधव, अनुष्का पवार, प्रतीक्षा कांबळे, ऋचा वाघमारे , वैष्णवी आगावणे , सलोनी सर्वगोड ,प्रज्ञा कांबळे ,नेहा सोनवणे ,शितल राऊत ,समीक्षा चव्हाण,सुप्रिया इंगळे, भारती वाघमोडे ,साक्षी आडगळे ,आर्या पचंडराव, श्रेया भिसे ,शिवराज चव्हाण, आर्यन आगलावे, अनिकेत भोरे , विठ्ठल भाग्यवंत, शुभम घाडगे, अनिकेत परदेशी, साहिल वाघमारे, अनिकेत कांबळे, आदित्य नवले, विजय क्षीरसागर, विनय देवमारे, दिग्विजय कुलाल, सारंग सरवदे, आदित्य जाधव, वैभव खंकाळ, यश सर्वगोड, ओंकार नलवडे, इत्यादी विद्यार्थ्यांनी स्वतंत्र प्रोजेक्ट बनवले आहे यासाठी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर**
**पत्ता :- गुरुनानक चौक, ऑफीसर क्लब समोर, सोलापूर ४१३००३**
**ई-मेल पत्ता :- eesid@ymail.com दूरध्वनी क्र. (०२१७) २७४०६६३**

### निविदा सुचना क्र. १२ सन २०२४-२५

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने, कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या //wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

**कामांची नांवे** : १ ) म.प्र. एकरुख ता.उ.सोलापूर प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील सिंचन परिचलनाच्या दृष्टीने आवश्यक देखभाल दुरुस्तीचे काम.
: २ ) म.प्र. जवळगांव ता. द. बार्शी प्रकल्पाच्या सिंचन परिचनलाच्या दृष्टीने आवश्यक देखभाल दुरुस्तीचे काम.
: ३ ) ल.पा. तलाव भुरीकवठे ता. अक्कलकोट प्रकल्पाच्या सिंचन परिचनलाच्या दृष्टीने आवश्यक देखभाल दुरुस्तीचे काम.

**जिल्हा** : सोलापूर
**निविदेची किंमत रुपये- अनुक्रमे रक्कम** : १. रु. ८.३२ लक्ष २. रु. ७.६८ लक्ष ३. रु. ८.३० लक्ष
**निविदा उपलब्ध कालावधी** : दिनांक-२९/०२/२०२५ ते दिनांक ०३/०२/२०२५.
**निविदा उघडण्याचा दिनांक** : दिनांक ०४/०२/२०२५ शक्य झाल्यास

जा.क्र. सोपावि/लेशा/ई निविदा/२६४/२०२५
दिनांक २३/०१/२०२५
कार्यकारी अभियंता सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर यांचे कार्यालय

सही/-
(मो.ता. जाधवर)
कार्यकारी अभियंता
सोलापूर पाटबंधारे विभाग,सोलापूर

**जिमाका/सो/जाहि/२८६/२०२४-२५**

## पंढरपूरातील १६ भक्त प्रयागराज येथे शाहीस्नानासाठी दाखल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** उत्तर प्रदेश येथील प्रयागराज मधील गंगानदीचे शाहीस्नान करण्यासाठी पंढरपूरातील व्यापारी, शिक्षक, अधिकारी असे १६ भक्त खास वाहन करुन रविवारी सकाळी पंढरपूरातून प्रयागराजकडे मार्गस्थ झाले.

यामध्ये अनिल अभंगराव, सुनील वाळूजकर, धनंजय मिसाळ, अमोल कुलकर्णी, राजेंद्र जाधव, कांतीलाल सुपेकर, विठ्ठल घोडके, जुगलभाई बाहेती, विष्णु मैंदर्गीकर, गणेश काळे, बन्सीलाल सुपेकर, पवन झंवर, प्रशांत आगावणे, संजय जवंजाळ, राहुल पावले, अनंत अष्टेकर यांचा समावेश आहे.

रविवारी सकाळी भोसले चौक येथून खास वाहनाने १६ भक्त प्रयागराज येथे जाण्यासाठी निघाली. यावेळी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी अनेक नागरिक उपस्थित होते. प्रयागराज येथे महाकुंभ मेळा सुरु आहे यानिमित्त गंगा नदीमध्ये पवित्र स्नान करण्यासाठी देश विदेशातून कोट्यावधी नागरिक दाखल झाले आहेत. यानिमित्त तिर्थक्षेत्र पंढरपूर येथून १६ भक्त खास वाहनाने प्रयागराज येथे दाखल होण्यासाठी गेले आहे. बुधवार दर्श मौनी अमावस्यानिमित्त शाहीस्नान करणार आहेत.

## फुले शाहू आंबेडकर विचार मंचाचे वतीने 'संविधान' उद्देशीकिचे वाचन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** 26 जानेवारी 1950 पासून भारतीय संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली व खऱ्या अर्थाने प्रजेचे राज्य सुरु झाले म्हणुन 26जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. आज प्रजासत्ताक दिनाचे 75वे वर्ष असून अमृत महोत्सव देशभर सुरु झाला असून फुले शाहू आंबेडकर विचार मंचाचे वतीने "घर घर संविधान "हे अभियान सुरु केले आहे असे विचार विचारमंचचे अध्यक्ष सुनील वाघमारे यांनी व्यक्त केले. पुढे ते म्हणाले कीं वास्तविक पाहता स्वातंत्र्यांचा 75वी घर घर तिरंगा करणाऱ्या सरकारची ही जबाबदारी होती पण सरकारने दुर्लक्ष केल्याचे दिसते. आम्ही वर्षभर हे अभियान राबविणार असून तालुक्यातील सर्व प्रशालेला संविधानाची प्रत भेट देणार असून त्याचे महत्व पटवून सांगणार असून स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन यां दोन दिवसा बाबत जो संभ्रम आहे तो दूर करण्याचा प्रयत्न करणार आहोत. तसेच 26नोव्हेंबर रोजी तालुका पातळीवार मोठा कार्यक्रम घेतला जाणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सुरुवातीस किसन सरवदे सर यांचे हस्ते बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास पुष्प हार अर्पण करण्यातआला. त्यानंतर संविधान प्रतीस अभिवादन करण्यात येऊन उद्देशीकिचे सामूहिक वाचन करण्यात आले.यावेळी अध्यक्ष सुनील वाघमारे, उपाध्यक्ष कीर्तीपाल सर्वगोड,खजिनदार दादासाहेब दोडके सर, सह खजिनदार सिकंदर ढवळे सर सल्लगार श्रीकांत कसबे, राजेंद्र पाराध्ये, विठ्ठल कांबळे,संतोष सर्वगोड, सुकदेव माने, राजेंद्र सर्वगोड, रविंद्र सर्वगोड, गुरु दोडिया, कैलास ओव्हाळ,पत्रकार रामचंद्र सरवदे आदी उपस्थित होते.




## विविध कलाविष्कारांनी विद्यार्थ्यांनी मने जिंकली

# पंढरपूर सिंहगड पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** कोर्टी (ता. पंढरपूर) येथील सिंहगड पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन एक विशिष्ट आदर्श बनलेले , सामाजिक विषयांना याद्वारे सक्षमपणे वास्तवात मांडणारे, शिस्तप्रिय असणारे व रसिकप्रिय म्हणून सुप्रसिद्ध असलेले सिंहगड पब्लिक स्कूल, कोर्टी येथील १५ वे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले असल्याची माहिती स्कूलच्या प्राचार्या स्मिता नवले यांनी दिली.

या कार्यक्रमाच्या पहिल्या दिवसाचे उद्घाटन श्री. मारुती लिगाडे, गटशिक्षणाधिकारी पंढरपूर व दुस-या दिवसाचे उद्घाटन श्रीकांत बडवे महाजन संस्थापक कलासाधना सांस्कृतिक मंडळ, पंढरपूर यांच्या हस्ते झाले. तसेच सन्माननीय पाहुणे डॉक्टर आशा बोकील मॅडम उपस्थित होते. पंढरपूर सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर कैलाश करांडे, प्राचार्या सौ. स्मिता नवले, मुख्याध्यापिका सौ. स्मिता नायर आदी उपस्थित मान्यवर यांनी सरस्वती पूजन करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी स्कूलच्या प्राचार्या स्मिता नवले यांनी प्रास्ताविक करताना स्कूलच्या शैक्षणिक प्रगतीचा वार्षिक आढावा उपस्थितांना सांगितला.

या स्नेहसंमेलनात भारतीय सण या संकल्पनेवर सुरेख सादरीकरण विद्यार्थ्यांनी सादर केले. सर्वच शिक्षकांनी या विषयांना यशस्वीपणे मांडताना विविध कलाप्रकार, नृत्यप्रकार, विशिष्ट पेहराव, संगीत, रंगमंच सजावट यांचा सूरेख वापर केला.सरस्वती वंदना, गणेश वंदना, तबला वादन, ऑर्केसट्रा, राष्ट्रीय व जागतिक मुल्य विषयक नृत्य व काही नाटक विद्यार्थ्यांनी सादर केले.

याकार्यक्रमासाठी सिंहगड पब्लिक स्कूल कोर्टीचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी यांनी परिश्रम घेतले.

संपादकीय विशेष

# आता जबाबदारी उचला

गेल्या चार महिन्यांपासून आठवा वेतन आयोग स्थापन केला जातो की नाही, त्याला काही पर्याय पुढे केला जातो का, अशा चर्चा होत्या. यासंदर्भातील ताज्या निर्णयानंतर या चर्चेवर पडदा पडायला हरकत नाही. दिल्लीमध्ये लष्कर विभागासह केंद्रीय कर्मचाऱ्यांची संख्या चार लाख आहे. ते मतदार आहेत. त्यांच्या कुटुंबातील एकूण मतदारांची संख्या लक्षात घेतली, तर ही संख्या दहा लाख होईल. कर्मचारी आयोगाच्या शिफारशी यायला अजून दोन वर्षे असली, तरी ताज्या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना खुशीची गाजरे देण्यात आली आहेत. शिवाय निवृत्त कर्मचाऱ्यांची संख्याही जास्त आहे. मोदी मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेबाबत महत्त्वाची घोषणा केल्याचा थेट परिणाम लाखो लोकांवर होणार आहे. देशात केंद्रीय कर्मचाऱ्यांची संख्या पन्नास लाखांच्या घरात आहे, तर निवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या 65 लाख आहे. आठवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात लक्षणीय वाढ होणार आहे. त्यांची आर्थिक स्थिती आणखी मजबूत होणार आहे. केंद्रीय वेतन आयोगाची अंमलबजावणी अनेक राज्य सरकारेही करत असतात. त्यामुळे या वेतन आयोगाचा फायदा लाखो नव्हे, तर काही कोटी कर्मचाऱ्यांना होणार आहे. नवीन वेतन आयोग स्थापन करण्याच्या निर्णयाआधारे अर्थव्यवस्थेलाही त्याचा फायदा होईल, असा निष्कर्ष काढणे स्वाभाविक आहे. कारण सरकारी कर्मचाऱ्यांची क्रयशक्ती वाढली, तर उपभोगही वाढेल. हे होईल यात शंका नाही, पण सरकारी कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आणि परिणामकारकताही वाढेल आणि ते उत्तरदायी होतील का, असा सामान्यांना पडणारा प्रश्न आहे.

वेतन आयोगाचा अहवाल लागू झाल्यानंतर दोन-तीन वर्षांपर्यंत नवी घरे, कार आणि घरगुती वस्तूंच्या मागणीत वाढ झाल्याचे दिसून येते. त्याचा सकारात्मक परिणाम पर्यटनावरही दिसू लागला आहे. त्याचा परिणाम महागाईवरही दिसून येतो. कारण बाजारातील मागणी वाढते. तसेच, बहुतेक सरकारी कर्मचारी जास्त कर भरतात म्हणून सरकारचा महसूल वाढतो. 2025-26 पर्यंत सरकारची वित्तीय तूट जीडीपीच्या 4.5 टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. चालू आर्थिक वर्षासाठी ही तूट 4.9 टक्के राहील, असा अंदाज आहे. आठव्या वेतन आयोगाचे पगार, महागाई भत्ता, निवृत्तीवेतन ठरवण्याचे निकष पाहिल्यास पगार सध्याच्या पगाराच्या तिप्पट होईल, असा प्राथमिक अंदाज आहे. सरकारने वित्तीय तूट साडेतीन टक्क्यांच्या आत आणण्याचे वारंवार जाहीर केले असले, तरी साध्य झालेले नाही. सातव्या वेतन आयोगाने सरकारी तिजोरीवर एक लाख कोटी रुपयांचा बोजा पडला होता. आठव्या वेतन आयोगामुळे हा बोजा वाढून दोन लाख कोटी रुपयांवर जाण्याची शक्यता आहे. वेतन वाढले की सरकार उत्पन्नवाढीसाठी आणि वित्तीय तूट कमी करण्यासाठी काय करणार, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. पगारवाढीमुळे केंद्र सरकारच्या वित्तीय तुटीवर ताण पडेल. त्यामुळे तूट जीडीपीच्या तीन टक्क्यांपर्यंत कमी करणे अधिक महत्त्वाचे आहे.

आठव्या वेतन आयोगाचा परिणाम राज्य सरकार, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि नगरपालिका संस्थांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन संरचनेवर होईल. त्यामुळे पेन्शन बिलातही वाढ होणार आहे. याचा अर्थव्यवस्थेवर व्यापक परिणाम होणार आहे. पुढील वर्षापासून सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात आणि निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमध्ये मोठी वाढ होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. हा निर्णय आल्यानंतर सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाची लाट उसळली; मात्र त्यामुळे सरकारी तिजोरीवर पडणारा भार कमी करण्यासाठी अर्थसंकल्पात नवा बोजा टाकला जाईल का, असा प्रश्नही निर्माण झाला आहे. सरकारकडे खर्च करण्यासाठी पैशांची कमतरता आहे, त्यासाठी बाजारातून कर्ज घेणे वाढत आहे. अशा स्थितीत या ओझ्याला तोंड देण्यासाठी सरकारला काही तरी करावे लागेल. या प्रश्नाचा गांभीर्याने विचार व्हायला हवा, कारण सरासरी सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये कामाप्रती निष्ठा आणि समर्पण नसल्याचा प्रश्न वारंवार उपस्थित होत राहतो. सरकारी कामात दिरंगाई आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारी सर्रास समोर येत आहेत, हे कोणापासून लपून राहिलेले नाही. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात सरकारी कर्मचारी क्वचितच सेवा देण्यासाठी तयार असतात, हा मुद्दाही आहे.

सरकार आपल्या विभागांच्या कार्यपद्धतीबाबत कितीही दावे करत असले, तरी वस्तुस्थिती अशी आहे, की सामान्य नागरिक सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यशैलीवर नाराज आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये सेवा मिळत नसल्याच्या तक्रारीही ते करत असतात.

सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या एकूण कर्मचाऱ्यांच्या एक टक्क्यांच्या आत आहे. हा वर्गच फक्त संघटित आहे. संघटित क्षेत्रातील वर्गाला सवलती दिल्या जात असताना त्याच्या बाहेर राहिलेल्या सुमारे 85 टक्के असंघटित कामगारांच्या वेतनाचा मात्र कुणीच विचार करीत नाही. सरकारी नोकऱ्या यापुढे खात्रीशीर सेवा कालावधी आणि आरामाच्या समानार्थी नसतील, तेव्हा हे शक्य होईल. सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते त्यांच्या कामगिरीच्या आधारे निश्चित करणे ही काळाची गरज आहे. अधिक चांगली कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्याला बक्षीस मिळावे मात्र सेवेचे निकष पूर्ण न करणाऱ्याला परावृत्त केले पाहिजे. किमान सरकार-कमाल प्रशासनाची कल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने ठोस पावले उचलण्याचीही गरज आहे. याबाबत अनेकदा चर्चा झाली; पण त्यानुसार काहीही झाले नाही. दरम्यान, दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारशींची पूर्ण अंमलबजावणी का होऊ शकली नाही, हे समजणे कठीण आहे.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यापूर्वी 'आयआयएम' अहमदाबादने सरकारी कर्मचारी आणि खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाची तुलना केली होती. त्यात त्यांना खालच्या दर्जाच्या सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले होते. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (पीएसयू) आणि स्वायत्त संस्था आणि ग्रामीण डाक सेवकांचे कर्मचारी वेतन आयोगाच्या कक्षेत येत नाहीत. या पार्श्वभूमीवर सरकारी खात्यांचा कारभार सुधारता आला तर समाज आणि सरकारलाही फायदा होईल. आठव्या वेतन आयोगाचा लाभ पेन्शनधारकांनाही मिळणार असल्याने खासगी क्षेत्रातील संघटित आणि असंघटित कर्मचाऱ्यांच्या सामाजिक सुरक्षेचीही काळजी घेणे गरजेचे आहे.

# पगारवाढीचा दिलासा, डाळींचा खुलासा

**सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीत काही महत्वाची निरिक्षणे लक्षवेधी ठरली. यापैकी या वर्षात कर्मचाऱ्यांच्या पगारात आठ ते दहा टक्के वाढीची शक्यता असल्याची बातमी दिलासा देऊन गेली. लग्नाच्या हंगामात सोने आणि चांदीची झळाळी वाढणे अनेकांना गोंधळात पाडणारे ठरले. दरम्यान, सामान्यांच्या आयुष्यातील महत्वाचा घटक असलेली तूरडाळ स्वस्त होण्याची शक्यता नोंद घेण्याजोगी वार्ता ठरली.**

अर्थनगरीतून



महेश देशपांडे
अर्थतज्ज्ञ

सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीत अनेक दखलपात्र घडामोडी अनुभवायला मिळाल्या असल्या तरी काही महत्वाची निरिक्षणे लक्षवेधी ठरली. म्हणूनच त्यांचा प्रमुख बातम्या म्हणून उल्लेख करता येतो. यापैकी या वर्षात कर्मचाऱ्यांच्या पगारात आठ ते दहा टक्के वाढीची शक्यता असल्याची बातमी दिलासा देऊन गेली. लग्नाच्या हंगामात सोने आणि चांदीची झळाली वाढणे अनेकांसाठी त्रासदायक ठरले. दरम्यान, सामान्यांच्या आयुष्यातील महत्वाचा घटक असलेली तूरडाळ स्वस्त होण्याची शक्यता नोंद घेण्याजोगी वार्ता ठरली.

नवीन वर्ष भारतीय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची भेट घेऊन आले आहे. एका नवीन अहवालानुसार, 2025 मध्ये देशातील अनेक वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कामगारांची मोठी वाढ होईल. 'मर्सर' या 'एचआर कन्सल्टिंग फर्मने एकूण मोबदल्याच्या सर्वेक्षणावर आधारित एक अहवाल तयार केला. गेल्या पाच वर्षांमध्ये भारतातील कर्मचाऱ्यांच्या पगारात सातत्याने वाढ झाल्याचे आढळून आले. 2020 मध्ये आठ टक्के असलेली पगारवाढ 2025 मध्ये 9.4 टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. अहवालानुसार, सर्व क्षेत्रांमध्ये 9.4 टक्क्यांपर्यंत होऊ घातलेली पगारवाढ देशाच्या मजबूत आर्थिक वाढीचे आणि कुशल प्रतिभेच्या वाढत्या मागणीचे प्रतिबिंब आहे. या यादीमध्ये ऑटोमोटिव्ह क्षेत्राला आघाडीवर ठेवण्यात आले आहे. या क्षेत्रात, पगारवाढ 8.8 ते दहा टक्क्यांदरम्यान असण्याचा अंदाज आहे. याचे श्रेय देशातील इलेक्ट्रिक वाहनांची वाढती मागणी आणि भारत सरकारच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमाला जाते. उत्पादन आणि अभियांत्रिकी क्षेत्र या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनामध्ये आठ ते 9.7 टक्क्यांनी वाढ होऊ शकते, जी उत्पादन परिसंस्थेच्या वाढीचे प्रतिबिंब आहे. सर्वेक्षणामध्ये 1,550 कंपन्यांनी भाग घेतला. 'मर्सर'च्या या सर्वेक्षणात देशातील विविध क्षेत्रातील 1,550 हून अधिक कंपन्यांनी भाग घेतला. त्यात तंत्रज्ञान, जीवन विज्ञान, वित्तीय सेवा, ग्राहकोपयोगी वस्तू, उत्पादन आणि ऑटोमोटिव्ह क्षेत्रांचा समावेश आहे.

अहवालात असेही दिसून आले आहे की 37 टक्के संस्था 2025 मध्ये आपल्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची योजना आखत आहेत, जे देशभरातील प्रतिभेच्या वाढत्या मागणीचे प्रतिबिंब आहे. या कालावधीत, कंपन्यांमधील टाळेबंदीदेखील 11.9 टक्क्यांवर स्थिर राहण्याची अपेक्षा आहे. 'मर्सर इंडिया'च्या करिअर लीडर मानसी सिंघल म्हणाल्या की देशातील प्रतिभा क्षेत्र बदलाच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्यातून जात आहे. 75 टक्के संस्थांमध्ये चांगल्या कामावर आधारित वेतन योजना स्वीकारली जात आहे. यामुळे या स्पर्धात्मक बाजारपेठेत, कंपन्या प्रतिभा आकर्षित करण्याच्या आणि टिकवून ठेवण्याच्या ट्रेंडला प्राधान्य देत आहेत.




आता एक दखलपात्र बातमी. सोन्याच्या बाजारपेठेत पुन्हा तेजी येऊ लागली आहे. नवीन वस्तू खरेदी करण्यासाठी अशुभ मानल्या जाणाऱ्या खरमासाच्या समाप्तीनंतर, मकर संक्रांतीपासून सुरू झालेला शुभ मुहूर्त परत येताच, सोने खरेदीदार आणि गुंतवणूकदारांनी पुन्हा सोने खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे लग्नाचा हंगाम जवळ येत आहे. सोन्याची खरेदी वाढल्याने किंमतीही वाढू लागल्या आहेत. सराफा बाजारात सोन्याचा भाव 500 रुपयांनी वाढून 81,300 रुपये प्रतितोळा झाला. तो दोन महिन्यांमधील उच्चांक आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्याचे भाव वाढत असून 2,737.50 डॉलर प्रति औंस दरावर पोहोचले आहे. 12 डिसेंबर 2024 नंतरची ती सर्वोच्च पातळी आहे. डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे भाव आणखी वाढू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. जागतिक आर्थिक अस्थिरतेमुळे सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोन्यातील गुंतवणूक वाढू शकते. चांदीच्या किमतीही वाढत आहेत. चांदीचा दरही 2,300 रुपयांनी वाढून 94,000 रुपये प्रति किलो झाला आहे. 'एलकेपी सिक्युरिटीज'चे उपाध्यक्ष जतिन त्रिवेदी म्हणाले की अपेक्षेपेक्षा कमी महागाई दरामुळे सोन्याच्या किमतींना आधार मिळाला आहे. चलनवाढीचा दर कमी झाल्यामुळे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हची दरकपात करत राहील, अशी अपेक्षा बळावली आहे. त्यामुळे सोन्याच्या किमतीत वाढ झाली आहे.

सोनेखरेदी वाढण्याचे कारण म्हणजे 1 फेब्रुवारी 2025 रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये सरकार सोन्यावरील आयात शुल्क वाढवू शकते. व्यापार तूट कमी करण्यासाठी 23 जुलै 2024 रोजी अर्थसंकल्पात 15 टक्क्यांवरून सहा टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आलेले आयात शुल्क वाढवले जाण्याची शक्यता आहे. नवीन वर्षात सोने आणि चांदीचा झोका उंच आकाशी पोहोचला. 2025 च्या बजेटपूर्वीच दोन्ही धातूंचा आलेख उंचावला आहे. सोन्यासोबत या वेळी चांदीने गरूडभरारी घेतली आहे. गेल्या पंधरवड्यात किमती धातूंनी खरेदीदारांची झोप उडवली. अनेकांच्या खिशावर संक्रांत आली. तर या आठवड्याच्या अखेरीस दोन्ही धातूंनी जोरदार मुसंडी मारली. या आठवड्यात सोन्याने जोरदार मुसंडी मारली. एका आठवड्यात सोने 1730 रुपयांनी महागले. 'गुड रिटर्न्स'नुसार, आता 22 कॅरेट सोने प्रति दहा ग्रॅम 74,650 रुपये तर 24 कॅरेट सोन्याचा भाव प्रति 10 ग्रॅमसाठी 81,420 रुपये आहे. या महिन्यात चांदीने मोठी भरारी घेतली. 'गुड रिटर्न्स'नुसार, एक किलो चांदीचा भाव 96 हजार 500 रुपये इतका आहे.

गेल्या तीन-चार वर्षांमध्ये कडधान्यापासून अन्नधान्यापर्यंत सर्वच घटकांचे दर महागले आहेत. तुरीचे भाव गडगडल्याने आता तूरडाळ स्वस्त होण्याची शक्यता आहे. इतर डाळींच्या किंमतीही कमी होण्याची शक्यता आहे.सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तुरीचे दर घसरले आहेत. ते साडेतेरा हजार रुपये प्रति क्विंटल इतके झाले आहेत. त्यामुळे आता तूरडाळीचे दरदेखील कमी होत आहेत. ते सुमारे 40 रुपयांनी कमी झाले आहेत. यामुळे तूरडाळीचे गगनाला भिडलेले दर आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात येणार आहेत. मोठ्या प्रमाणात उत्पादनाच्या शक्यतेने सांगलीतील ठोक बाजारात तूरडाळीचे दर किलोमागे 40 रुपयांनी उतरले आहेत. तूरडाळीचे दर कमी होऊ लागताच मूग, मसूर आणि हरभरा डाळीचे दरही उतरले आहेत. नवीन हंगामातील तुरीची आवक अद्याप सुरू झालेली नाही. सांगलीच्या बाजारात तूरडाळीचा दर क्विंटलला 13 हजार 500 रुपये होता. पंधरा दिवसांपूर्वी याच तूरडाळीचा दर क्विंटलला 17 हजार 500 रुपये होता. किरकोळ बाजारात तूरडाळीचे दर किलोला 190 रुपयांपर्यंत पोहोचले होते. ते आता 150 रुपयांपर्यंत उतरले आहेत. ऐन दसरा-दिवाळीमध्ये हरभरा डाळीचे दर 110 रुपये किलोपर्यंत पोहोचले होते. ते ही खाली आले आहेत.

नवीन हंगामातील हरभरा बाजारात येण्यापूर्वीच हरभरा डाळीचे दर 20 रुपयांनी खाली आले आहेत. मसूर डाळीचे दर किलोला 90 रुपयांवर स्थिर असले तरी मूगडाळीचे दर मात्र किलोला 10 ते 15 रुपये उतरले आहेत. नवीन हंगामातील तुरीची अद्याप बाजारात आवक झालेली नाही. या वर्षी चांगला पाऊस झाल्याने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या प्रांतात तुरीचे विक्रमी पीक आले आहे. देशांतर्गत तुरीची मागणी 42 लाख टनांची आहे. यंदा देशांतर्गतच तेवढे उत्पादन होण्याची शक्यता आहे. शिवाय बाहेरील देशांमधून सुमारे 10 लाख टन तूर आयातीचे करार झालेले आहेत. यामुळे तुरीचा साठा हा मागणीपेक्षा जास्तीचा होणार आहे.





## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. हाती घेतलेल्या कामात प्रगती होईल. प्रवास लाभदायक ठरेल.
- **वृषभ** : जुने विकार पुन्हा उद्‌भवतील. सरकारी कामं विलंबानं होतील. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मिथुन** : दिलासादायक घटना घडतील. रखडलेल्या कामांना गती येईल. मित्र-नातलगांचं सहकार्य लाभेल.
- **कर्क** : कामाबाबत अनुत्साह राहील. चिंता निर्माण करणाऱ्या घटना संभवतात. विचारपूर्वक पावलं टाकावी.
- **सिंह** : स्थावर प्रश्नांबाबत दिलासा मिळेल. जोडीदाराचा आग्रह मोडू नका. धनलाभाचे योग आहेत.
- **कन्या** : महत्त्वाची कामं मनासारखी होतील. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. मैत्री अधिक दृढ होईल.
- **तूळ** : प्रवासाचे योग आहेत. प्रकृतीच्या किरकोळ तक्रारी राहतील. पूर्वीच्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **वृश्चिक** : महत्त्वाची कामं रखडतील. रागावर वेळीच नियंत्रण ठेवावं. स्वमताग्रह टाळणं हिताचं ठरणार आहे.
- **धनु** : आर्थिक योजनांना गती येईल. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. निर्णय विचारांती घ्यावे.
- **मकर** : आपल्या भूमिकेवर ठाम रहा. कार्यक्षेत्रात प्रभाव वाढेल. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात संधींचा लाभ घ्या.
- **कुंभ** : कामाचा व्याप अचानक वाढेल. नव्या करारांबाबत बोलणी होतील. विवाहाच्या प्रयत्नांना यश येईल.
- **मीन** : अर्थार्जनाच्या नव्या संधी लाभतील. उपजत कला-गुणांचा विकास होईल. बाकी चिंता नसावी.

सल्ला मोलाचा

## विविधरंगी छटा

आपल्याला आयुष्याच्या वाटचालीत अनेकांची साथ-सोबत लाभत असते. त्यातील काहींचा सहवास अल्पकाळचा असतो. काही दीर्घकाळ स्मरणात राहतात. त्याच बरोबर सतत नवनवीन ओळखीही होत असतात. विशेष म्हणजे या साऱ्यांमध्येही वैविध्य पहायला मिळतं. वेगवेगळ्या स्वभावाच्या या व्यक्तींचा सहवास, त्यांच्याशी मैत्री हासुध्दा एक निरिक्षणाचा, अभ्यासाचा भाग ठरत असतो. खरं तर या साऱ्यांशी जमवून घेणं सोपं नसतं. तिथंही बऱ्याचदा तडजोड करावी लागते. मात्र, यातूनच जीवनाचे विविध रंग उलगडत जातात. त्यांची दु:खं पाहून आपली दु:खं हलकी होतात तर त्यांचं समाधान पाहून आपल्या आयुष्यात यापेक्षाही अधिक समाधानी रहायला हवं, याची जाणीव होते. त्या अर्थाने विचार करायचा तर जीवनाच्या प्रवासात अशी विविध रंगांची उधळण हवीच. नाही का? वेगवेगळ्या स्वभावाची माणसं म्हणजे जणू जीवनातील विविध रंग. त्यांना एकत्र करून आपलंही जीवनात विविध रंगांच्या छटा निर्माण करण्यातच खरं कौशल्य आहे.

## २८ जानेवारी

दिनविशेष

- **१९३९** : सुप्रसिद्ध आयरिश कवी डब्ल्यू. बी. यीट्स यांचे निधन.
- **२००४** : डेव्हिड केली मृत्युप्रकरणी विपरीत बातम्या दिल्याप्रकरणी बीबीसीचे महासंचालक ग्रेग डाइक यांचा राजीनामा.
- **२०१३** : पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील अपघातात सिनेकलाकार भालचंद्र कदम, हृदयनाथ राणे जखमी.
- **२०१४** : केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री कुमारी शैलजा यांनी पदाचा राजीनामा दिला.

महत्त्वपूर्ण काही...

## तापमानवाढीचं संकट

जागतिक तापमानवाढीचा मुद्दा सध्या बराच ऐरणीवर येत आहे. या तापमानवाढीचे दुष्परिणामही दिसून येत आहेत. एक प्रकारे हे उष्णतेचं युग आहे असं म्हणावं लागेल. परंतु कोट्यवधी वर्षात आलेल्या उष्णयुगातील सर्वात वेगवान उष्ण युग सुमारे साडेसहा कोटी वर्षांपूर्वी आलं होतं. त्यावेळी कार्बनच्या वाढीचा दर दहा हजार वर्षात ३०० कोटी टन (एक पीपीएम) असा होता. परंतु सध्या दर वर्षी पृथ्वीच्या वातावरणात ६०० कोटी टन कार्बनची (कार्बन डाय ऑक्साईड आणि तत्सम वायू) भर पडत आहे. याचा अर्थ एका वर्षात सर्वात वेगवान उष्णयुगाच्या तुलनेत २० हजार वर्षे ओलांडली जात आहेत. या पध्दतीने चालू दशकात दोन लाख वर्षे ओलांडली जाणार आहेत. गेली काही वर्षे उच्चतम तापमान सातत्यानं वाढत आहे. दर वर्षी उच्चतम तापमानात सुमारे अर्धा ते पाऊण अंश सेल्सियसची वाढ होत आहे. असं पृथ्वीवर यापूर्वी कधी घडलं नाही. या महाविस्फोटक तापमान वाढीबाबतचं सत्य लक्षात घेऊन त्याच्या विनाशकारी परिणामांपासून मानव जातीला वाचवण्यासाठी गांभीर्यानं पावलं टाकावी असं शास्त्रज्ञांचं मत आहे.

पंचांग

**मंगळवार, २८ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष कृ. १४, नक्षत्र : पूर्वाषाढा
चंद्रराशी : धनु, वज्र योग,
सूर्योदय : ७.१३, सूर्यास्त : ६.२९

फॉरवर्डस


आयुष्यात बरंच काही मिळालं तरी न मिळालेल्यांचा विचार करतो...

**मिलता तो बहुत कुछ है इस जिंदगी में**
**बस हम गिनती उसी की करते है जो हासिल ना हो सका...**

आरोग्यमंत्र

## हे धोकेही जाणून घ्या

सद्यस्थितीत रक्तगटांविषयी बहुतेकांना माहिती असते. कोणत्या रक्तगटाचं रक्त कोणत्या रक्तगटाच्या व्यक्तिला चालतं याचीही बऱ्यापैकी माहिती असते. परंतु रक्तगटाशी संबंधित धोक्यांबाबत फारसं जाणून घेतलं जात नाही. आज त्याचीच माहिती घेऊ...



लाल रक्तपेशींच्या पृष्ठभागावर अँटिजेन्स नामक घटक असतात. यामुळे प्रत्येक रक्तगटाच्या व्यक्ती काही प्रकारच्या विकारांचा प्रतिकार करू शकतात तर काही विकारांना बळी पडू शकतात. ए, बी, ओ आणि एबी हे प्रमुख रक्तगट आहेत. रक्तगटाचं पॉझिटिव्ह किंवा निगेटिव्ह असणं आरएच या घटकावर अवलंबून असतं. आरएच हा सुद्धा अँटिजेन आहे. रक्तगटाशी संबंधित विकार होऊ नये या हेतूने आपण जीवनशैलीशी संबंधित बदल करू शकतो.

ओ रक्तगटाच्या लोकांना हृदयविकाराची शक्यता कमी असते तर एबी, बी रक्तगट असणाऱ्यांना याचा धोका जास्त असतो. ओ रक्तगटाच्या लोकांना अल्सरची शक्यता जास्त असते. ए आणि बी रक्तगट असणाऱ्यांना रक्ताच्या गुठळ्याचा धोका ३० टक्क्यांनी जास्त असतो तर ओ रक्तगटाच्या लोकांना तो बराच कमी असतो. एबी रक्तगट असणाऱ्यांना हा धोका २० टक्क्यांपर्यंत असतो. ओ रक्तगटाच्या लोकांना गॅस्ट्रिक कॅन्सरचा धोका कमी तर इतर रक्तगटांना जास्त असतो. ए रक्तगट असणाऱ्यांना गॅस्ट्रिक कॅन्सरचा धोका सर्वात जास्त असतो. ओ रक्तगट असणाऱ्यांना स्वादुपिंडाच्या कर्करोगाची शक्यता कमी तर ए रक्तगट असणाऱ्यांना स्वादुपिंडाच्या कॅन्सरचा धोका ३२ टक्क्यांपर्यंत असतो.

## वाचा तर खरं

आजकाल बाजारात मटार बऱ्यापैकी उपलब्ध होत आहे. त्याला मागणीही चांगली आहे. मटारचं सेवन आरोग्यासाठी लाभदायक सिद्ध होतं. मटारमध्ये अँटीऑक्सिडंट आणि अँटी इन्फ्लेमेट्री गुणतत्त्वं असतात. याव्यतिरिक्त यात व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, ओमेगा ३, फॅट आणि झिंक आढळतं. मटारमध्ये फायबर फ्लेवोनॉइड्स, स्टार्च आणि प्रोटीनचीही उत्तम मात्रा असते. त्यामुळेच मटारच्या सेवनाने शरीराची पोषणसंबंधी जवळपास सर्व गरज भागते. मटारमध्ये चांगल्या प्रमाणात फायबर असल्यामुळे बद्धकोष्ठतेची तक्रार दूर होते. म्हणूनच या काळात आहारात मटारचं प्रमाण वाढवावं.

## कौशल्य हवं विक्रीचं

करिअरवाटा

आजकाल नोकरीपेक्षा स्वयंरोजगाराकडे अधिक ओढा दिसून येतो. त्यात अंगी काही कला असेल तर त्यालाच व्यावसायिक रूप देण्याचा विचार केला जातो. तुमच्याही अंगी काही वस्तू बनवण्याची कला असेल किंवा हस्तकलेच्या वस्तूंच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर चांगली संधी मिळू शकते. या वस्तू वेबसाईट्सच्या माध्यमातून विकल्या जातात.



यासाठी स्वत:ची वेबसाईट तयार करता येईल किंवा ई कॉमर्स वेबसाईट्सवरून विक्री करता येईल. हस्तकलेच्या अनोख्या किंवा अँटिक वस्तू विकण्याचा व्यवसाय करायचा तर या टिप्स उपयोगी पडतील.

✻ आपल्याकडच्या वस्तू वेगळ्या किंवा अँटिक असतील याची खात्री करून मगच त्या विक्रीसाठी उपलब्ध करा. लोकांना काहीतरी वेगळं, हटके हवं असतं. त्यामुळे अशाच वस्तू विका. तसंच झोकून देऊन काम करा.

✻ आपल्याकडच्या उत्पादनांचे प्रभावी फोटो पोस्ट करा. तसंच या उत्पादनांची माहिती अनोख्या पद्धतीने मांडा.

✻ सुरुवातीला ठराविक उत्पादनांचीच विक्री करा. वस्तूंची संख्या हळूहळू वाढवा. हस्तकलेच्या वस्तूंचा दर्जा टिकवून ठेवणं गरजेचं आहे. उत्तम आणि दर्जेदार वस्तूंची विक्री केली तरच तुम्ही ग्राहकांना जोडून घेऊ शकता.

खेचाखेची

## काय मिळालं?

एक सुस्वरुप सेक्रेटरी संतापून साहेबांच्या केबीनबाहेर येते. रागाने तिचे डोळे लाल झालेले असतात.

**मैत्रीण** : काय गं, काय झालं इतकं रागवायला?

**सेक्रेटरी** : साहेबांनी मला विचारलं, आज सायंकाळी तू फ्री आहेस का? तर मी हो म्हटलं.

**मैत्रीण** : मग...

**सेक्रेटरी** : कसलं काय? त्यांनी मला ६० पानं टाईप करायला दिली.


वेगळे काही

मध्य अमेरिकेत आढळणारा हा बेडूक इतका विषारी आहे की त्याला स्पर्श केला तरी आपला मृत्यू होऊ शकतो. दोन सेंटीमीटरच्या या बेडकाच्या त्वचेवर एक विषारी पदार्थ असून त्याला स्पर्श करणारी व्यक्ती अपंग होऊ शकते किंवा तिचा हार्टफेलही होऊ शकतो. पाहताना हा बेडूक फार छोटा आणि त्रासदायक नाही असं वाटतं. पण, या बेडकाच्या त्वचेवर असणारं प्यूमिलियोटॉक्सीन थेट मानवी श्वसनप्रणालीवर हल्ला करतं. अमेरिकेच्या बोनितो नॅशनल पार्कमध्ये गेले असताना त्यांना तेथे काही तरी हालचाल दिसली. जवळ जाऊन पाहिल्यानंतर तो ५० पैशांच्या नाण्यापेक्षाही लहान असणारा हा बेडूक त्यांना आढळला.

## टेस्टी पालक कबाब

रूचिरा

तेच ते पदार्थ खावून कंटाळा आला असेल तर हमखास कबाबची मागणी केली जाते. मात्र, त्यातही ठराविक प्रकार परिचयाचे असतात. त्यामुळे वेगळ्या प्रकारचे कबाब कसे करायचे, असा प्रश्न पडतो. चला तर आज पालक कबाब कसे करायचे ते पाहू.



**साहित्य** : पालकाची जुडी, चार मोठे बटाटे, पुदिना, कोथिंबीर, हिरव्या मिरच्या, एक वाटी भिजवलेली मुग डाळ, आलं-लसूण पेस्ट, धणे-जिरे पावडर, गरम मसाला, चवीपुरतं मीठ-साखर, सजावटीसाठी काजू इत्यादी.

**कृती** : सर्वप्रथम बटाटे उकडून किसून घ्या. पालकाची पेस्ट करुन घ्या. पुदिना, मिरच्या आणि कोथिंबीरदेखील मिक्सरमध्ये वाटून घ्या. भिजवलेली डाळ मिक्सरमध्ये बारीक करा. आता बारीक केलेलं हे सगळं साहित्य एकत्र करुन हलवून घ्या आणि त्यात मीठ, थोडी साखर, धणे-जिरे पावडर, गरम मसाला, आलं-लसूण पेस्ट, बटाटे मिसळा. मिश्रण एकजीव करुन त्याचे छोटे गोळे करा. आता त्याला कबाबचा आकार द्या. प्रत्येक कबाबवर एक काजू लावून थोड्या वेळासाठी फ्रीजमध्ये ठेवून द्या. सर्व्ह करण्यापूर्वी काही वेळ फ्रीजमधून काढा आणि गरम तेलात तळून घ्या.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

» Selected

## सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन



**सासवड :** आझाद हिंद सेनेचे संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने सासवड येथील एस टी आगारात त्यांना अधिकारी व कर्मचारी यांनी अभिवादन केले. या प्रसंगी आगार व्यवस्थापक सागर गाडे यांनी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. दोन्हीं महान व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेत सागर गाडे यांनी त्यांच्या कार्याची महती उपस्थितांना सांगितली. राजाराम गायकवाड, प्रविण गायकवाड, दत्तात्रय मदने, सुरेश कडू, पोपट गायकवाड, नितीन ओंबळे, संजय जगदाळे, गणेश कामथे, अंकुश जगदाळे वाजीद तांबोळी, लक्ष्मी गायकवाड, प्रतीक्षा यादव, ज्योत्स्ना कवळे, रुपाली गिरमे, संपूर्णानंद नाझरे यांसह अनेक अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. पोपट जैनक यांनी आभार मानले.

## पोलीस व पत्रकारांचा कृतज्ञता सोहळा



**सासवड :** पोलिस स्थापना दिवस व पत्रकार दिन याचे औचित्य साधून माजी उपनगराध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते वामनतात्या जगताप व त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने सासवड पोलिस स्टेशन येथील सर्व अधिकारी व शहरातील सर्व पत्रकार यांना भेट वस्तू देवून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सासवड पोलिस स्टेशन येथे आयोजित या कार्यक्रमास पोलिस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, वामन जगताप, पोलिस उपनिरीक्षक गणेश पाटील, अर्जुन चोरगे, अर्चना पाटीलव नारायण खंडागळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. अजय गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रवीण पवार, उद्योजक अनिल जगताप, माजी नगरसेवक गणेश जगताप, स्वराज मंडळाचे संतोष खोपडे, बंडूकाका जगताप, चेतन जगताप, श्रेयस जगताप, खंडू जगताप, ओंकार जगताप, शुभम जगताप, गुप्तवार्ताचे रुपेश भगत यांसह पोलिस कर्मचारी यावेळी उपस्थित होते. हेमंत ताकवले यांनी सूत्रसंचालन केले तर साकेत जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. दत्ता भोंगळे, सुधीर गुरव, बाळासाहेब कुलकर्णी, हेमंत ताकवले, जीवन कड, राजेंद्र बर्गे, गणेश मुळीक, संभाजी महामुनी, अमृत भांडवलकर, ए टी माने, सुनीता कसबे, छाया नानगुडे, निलेश जगताप, हनुमंत वाबळे, अझीम आतार, बापू मुळीक, जगदिश शिंदे ही पत्रकार क्षेत्रांतील मंडळी या प्रसंगी उपस्थित होती.

## पुरंदर तालुका भाजपा युवामोर्चा सरचिटणीसपदी स्वानंद अत्रे

**जेजुरी :** भारतीय जनता पक्षाची नुकतीच बैठक संपन्न झाली. या बैठकीत पुरंदर तालुका भाजपा युवा मोर्चा सरचिटणीसपदी जेजुरी येथील कार्यकर्ते स्वानंद प्रसाद अत्रे यांची निवड करण्यात आली. यावेळी भाजपाचे प्रदेश सचिव रौनक शेट्टी, अजिंक्य टेकवडे, पांडुरंग वहिले, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष साकेत जगताप, स्वप्निल मोडक, तालुका अध्यक्ष दिलीप कटके, उपाध्यक्ष अमोल जगताप , शुभम रणनवरे आदी उपस्थित होते.



## आंबोडी तंटामुक्त समिती, अध्यक्षपदी बोरकर

**जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील अंबोडी गावच्या तंटामुक्ती अध्यक्षपदी अनिल विठ्ठल बोरकर यांची नियुक्ती करण्यात आली. यापूर्वीचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बाळासाहेब बोरकर यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने, अनिल बोरकर यांची निवड करण्यात आली. यावेळी सरपंच राहुल बोरकर, श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष महेंद्र बोरकर, पोलीस पाटील स्वाती बोरकर, देवस्थान ट्रस्टचे सचिव संजय बोरकर, ग्रामपंचायत सदस्य संदीप बोरकर शालेय समिती अध्यक्ष सचिन बोरकर, ट्रस्टचे उपाध्यक्ष चंद्रकांत बोरकर, खजिनदार शांताराम बोरकर आदी उपस्थित होते.



# आदिवासी भागात उत्साह कायम

## ७६ व्या प्रजासत्ताक दिनी राष्ट्रध्वजाला मानवंदना, संविधानाचे पूजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील श्री क्षेत्र भीमाशंकर, तळेघर, राजपूर, फलोदे, निगडाळे, कोंढवळ आदी गावात ७६ वा प्रजासत्ताक दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्राथमिक शाळा, महाविद्यालये, आश्रमशाळा, सामाजिक संस्था, शासकीय इमारती येथे संविधान प्रास्ताविकेचे पूजन व ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कोंढवळ-निगडाळे येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत सदस्या सुरेखा लोहकरे,अंगणवाडी सेविका नंदाबाई लोहकरे यांच्या हस्ते ध्वजपूजन व सरपंच सविता कोकाटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी उमेश लोहकरे, स्वप्नील अस्वले, अंकुश लोहकरे, आशा कोकाटे, चिंतामण गेंगजे, विशाल लोहकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

निगडाळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संविधान प्रास्ताविका व ध्वजपूजन सेवानिवृत्त रेल्वे पोलीस उपनिरीक्षक सुरेश लोहकरे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा अश्विनी लोहकरे व ध्वजारोहण शरद सहकारी बँकेचे संचालक मारुती लोहकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामूहिक राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीत गायनाने राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापिका शोभा जाधव, नॅशनल हायवेचे सामाजिक तज्ज्ञ सल्लागार थॉमस चेरियन, सचिन निहाला, सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र गायकवाड, शिक्षक संतोष थोरात, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मधुकर सुरकुले, संजय शेळके, योगिता भोमाळे, लीलाबाई लोहकरे व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी शाळा राबवत असलेल्या 'एक वही, एक पेन' या उपक्रमास प्रतिसाद देत युवा सामाजिक कार्यकर्ते विशाल लोहकरे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, पट्ट्या आदी शैक्षणिक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विविध क्रीडा स्पर्धांत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देवून सन्मान करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणातून आपली मनोगते व्यक्त केली. ग्रामपंचायत व वनसमिती निगडाळेच्या वतीने खाऊवाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. विविध शाळांत प्रजासत्ताक दिनानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम व देखावे,पथनाट्ये सादर करुन सामाजिक संदेश देण्यात आला.



निगडाळे (ता. आंबेगाव) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ध्वजारोहणप्रसंगी उपस्थित मान्यवर.

## इंदापुरात प्रजासत्ताक दिन उत्साहात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इंदापूर तहसील कार्यालयाच्या प्रांगणात ७६ वा प्रजासत्ताक दिन पूर्ण जोशात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी इंदापूर तालुक्याचे तहसीलदार जीवन बनसोडे, निवासी नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे, महसूल नायब तहसीलदार केतकी कुलकर्णी, निवडणूक नायक तहसीलदार विजय घुगे, गट विकास अधिकारी सचिन खुडे, नगरपालिकेचे मुख्याधिकारी रमेश ढगे, इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे, सर्व महसूल कर्मचारी तसेच इंदापूर शहरातील प्रतिष्ठित व राजकीय प्रतिनिधी यांच्यासह मोठ्या संख्येने सर्वसामान्य नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात इंदापूर तालुक्याचे तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र पोलीस व होमगार्ड तसेच शाळेतील विद्यार्थी व एन सी सी च्या विद्यार्थ्यांनी सुंदर संचलन करीत राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

# आरोग्याचा कानमंत्र देत महिलांचे हळदीकुंकू

## पुरंदरमधील हिवरे येथे अभिनव उपक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** मकर संक्रातीच्या निमित्ताने सर्वत्र महिलांचे हळदीकुंकू व वाण वाटण्याचे कार्यक्रम सुरू आहेत. केवळ या संकल्पनेतील कार्यक्रम न करता महिलांच्या आरोग्य विषयक माहितीचे आदानप्रदान करत त्यांच्या आरोग्यविषयक समस्याबाबत एका छोटेखानी कार्यक्रम करत पुरंदर तालुक्यातील हिवरे गावच्या सर्व महिलांचा हळदीकुंकू समारंभ नुकताच संपन्न झाला.

सामाजिक उत्तरदायित्व जपणाऱ्या स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सासवडच्या चिंतामणी रुग्णालयाच्या वरिष्ठ परिचारिका राजश्री शिवरकर यांनी या वेळी उपस्थित महिलांना आरोग्यविषयक मौलिक मार्गदर्शन करत स्वतच्या आरोग्याकडे लक्ष देण्याचे आवाहन केले.



प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप तसेच सुयश इन्फोटेक चे चैतन्य भोसले यांनी महिलांना मार्गदर्शन करत उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. महिला बचत गटाच्या दिवे गराडे गणाच्या सीआरपी कार्तिकी कुदळे यांचे सुंदर सूत्रसंचालन, प्रतिष्ठानचे सचिव हेमंत ताकवले यांचे कविता वाचन व उपस्थित अनेक महिलांनी उखाणे घेत नावे घेत या कार्यक्रमाची रंगत अधिक वाढवली. नारीशक्ती महिला ग्रामसंघाच्या अध्यक्ष अश्विनी दळवी, सदस्या रेश्मा शेख, मंगल लिंभोरे, सुमन चाविर, आशा वर्कर स्वाती कुदळे, सुयश इन्फोटेकच्या अश्विनी कटके गावच्या सरपंच पुनम कामठे, सदस्या सोनाली चव्हाण तसेच मनिषा भोसले यांसह मोठ्या संख्येने महिला या कार्यक्रमास उपस्थित होत्या. एका वेगळ्या स्वरूपाच्या या कार्यक्रमाचे गावकऱ्यांनी अभिनंदन केले.

## सासवडच्या पालखी तळावर ध्वजारोहण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सासवड येथील पालखी तळावर असणा-या ग्रामीण भागातील व समुद्र सपाटीपासून सर्वांत उंच ध्वजस्तंभावरील ध्वजारोहण निवृत्त ब्रीगेडीयर सुमंथ उत्तमराव दशरथ यांच्या हस्ते आणि माजी आमदार व शिवस्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय जगताप यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

सासवड येथील शिवस्मृती प्रतिष्ठान आणि सासवड नगरपालिकेच्या वतीने व राष्ट्रध्वज समितीच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सासवड शहरातील वाघीरे महाविद्यालय, पुरंदर शैक्षणिक संकुल, वाघीरे हायस्कूल, नगरपालिका शिक्षण मंडळ, श्री शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल, गुरूकुल विद्यालयातील संचलन पथकाने मानवंदना दिली. १९७१ च्या भारत - पाक युद्धातील हिवरे (ता. पुरंदर) येथील शहिद जवान निवृत्ती गायकवाड यांच्या कुटुंबीयांचा तसेच दिल्ली येथील राजपथ वर संचलन केलेल्या तसेच क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर प्राविण्य मिळवलेल्या पुरंदर तालुक्यातील विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव सोनवणे, माजी नगराध्यक्ष मार्तंड भोंडे, माजी उपनगराध्यक्ष यशवंतराव जगताप, सुहास लांडगे, अजित जगताप, मनोहर जगताप, विजय वढणे, राष्ट्रध्वज समितीचे सचिव अनिल उरवणे, अनिल गद्रे, किरण पुरंदरे, नितीन भोंगळे, सुजित बडदे, ओंकार दळवी, सुरज कराडे, दिपक जगताप, नंदकुमार जगताप, संतोष गिरमे, डॉ सुमित काकडे यांसह शिवस्मृती प्रतिष्ठाण, राष्ट्रध्वज समिती, माजी सैनिक प्रतिष्ठाणचे सर्व सदस्य आणि नागरिक उपस्थित होते. प्रतिष्ठानचे सचिव सागर जगताप यांनी संचलनाचे समालोचन आणि सुत्रसंचलन, राष्ट्रध्वज समितीचे अध्यक्ष इस्माईल सय्यद यांनी प्रास्ताविक केले तर प्रा अमित पावशे यांनी आभार मानले.

## पारगाव येथून श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरला भाविक रवाना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** पारगाव (ता. आंबेगाव) येथून भाविक शुक्रवारी सकाळी संत निवृत्तीनाथ यात्रेनिमित श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरला रवाना झाले. यंदाचे हे २५ वे वर्ष आहे. पारगाव येथिल श्रीज्ञानेश्वर प्रासादिक भजन मंडळ व श्रीमुक्तादेवी पायी दिंडी सोहळा यांच्या वतीने दरवर्षी तीर्थक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे संत निवृत्तीनाथ यात्रेसाठी भाविक जातात. याप्रसंगी माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे, ग्रा.पं. सदस्य बाळासाहेब ढोबळे, बबनराव बारवे, शिवाजी ढोबळे, चंदकांत लोखंडे, किसन ढोबळे, अर्जून ढोबळे, दत्तात्रय लोखंडे, राजू ढोबळे, विठ्ठल लोखंडे, निवृत्ती लोखंडे, राजू साबळे, कल्पना ढोबळे, स्वाती ढोबळे, लिला साबळे, मिना मिंडे, कुसूम हिंगे, तेजल काळे आदी मान्यवर, भाविक उपस्थित होते.



## आकर्षक सजावट...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**जेजुरी** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्रीखंडोबा देवाच्या गडावर प्रजासत्ताक दिनानिमित्त आकर्षक सजावट करण्यात आली. देवस्थान विश्वस्त मंडळातर्फे खंडोबा मंदिरास तिरंगा रंगाची विद्युत रोषणाई करण्यात आली. तसेच मुख्य गाभारा फुलांची सजावट करण्यात आली होती.

# ढोबळेवाडी येथे अभिनव पद्धतीने प्रजासत्ताक दिन साजरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** ढोबळेवाडी (ता. आंबेगाव ) येथील येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ७६ वा प्रजासत्ताक दिन अभिनव पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी लहान मुलांना मोबाईल वापरायला न देणे, घरोघरी परसबागेची निर्मिती, विज्ञान व अध्यात्म यांची सांगड घालून मुलांवर संस्कार करणे या गोष्टींची सर्वांनी शपथ घेतली.

प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेत झेंडावंदन, विद्यार्थांची भाषणे झाली. ध्वजारोहण गणेश थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बाबुराव ढोबळे महाराज यांनी भूषवले. प्रजासत्ताक दिनानिमित्त सेंद्रिय शेती,महिलांचे आरोग्य, आरोग्य विषयी त्यांच्या समस्या, मोबाईलचा अतिरिक्त वापर या विषयावर परीसंवाद या वेळी पार पडला. सध्याचे जीवन हे धकाधकीचे जीवन बनले आहे. धावपळीच्या युगात माणूस आपल्या आहाराकडे कानाडोळा करत फास्ट फूडच्या मागे लागला आहे.

तसेच आहारात येणाऱ्या पालेभाज्या, फळे, धान्य ही संकरित स्वरूपाची आहेत. ज्याचा माणसाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो आहे. सेंद्रिय शेती ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे किमान आपल्या कुटुंबासाठी तरी परसबागेचा वापर करून त्यात सेंद्रिय पद्धतीने पालेभाज्या,फळभाज्या तयार करण्यात याव्यात व त्याचाच वापर रोजच्या आहारात केला जावा. यासाठी पुढील वर्षात किमान २५ ते ३० कुटुंबात तरी परसबाग तयार करायची शपथ यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी घेतली.

या चर्चेत उपसरपंच सचिन टाव्हरे, माजी उपसरपंच बाळासाहेब ह.भ.प.बाबुराव महाराज ढोबळे, दादाभाऊ टाव्हरे, प्रदिप ढोबळे, उद्योजक अविनाश ढोबळे, डॉ.संतोष ढोबळे, नितीन ढोबळे, रायचंद ढोबळे, निलम डौंदकर, सविता ढोबळे, बारकू ढोबळे, दीपक ढोबळे यांनी सहभाग घेतला. मुख्याध्यापक विजय थोरात यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर सहशिक्षक वैजयंता थोरात, अंगणवाडी सेविका लता लबडे, निर्मला पाचपुते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### आर्थिक व्यवस्थापन, तांत्रिक कार्यक्षमता यासह फायनान्स मॅनेजरसाठी सन्मानित

# सोमेश्वरचा व्हीएसआयकडून तीन पुरस्कार देत गौरव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** बारामती तालुक्यातील सोमेश्वर सह.साखर कारखान्यास वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वतीने उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापण, उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता असे दोन तर उत्कृष्ट फायनान्स मॅनेजर असे तीन राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

मांजरी-पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी पार पडली. यावेळी साखर क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शेतकरी, साखर कामगार, अधिकारी तसेच साखर कारखान्याचा सन्मान करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी 'व्हीएसआय'चे अध्यक्ष शरद पवार हे होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, राष्ट्रीय सहकारी साखरसंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, बाळासाहेब थोरात, खासदार विशाल पाटील, विश्वजित कदम, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, पी.आर.पाटील, राजेश टोपे, अशोक पवार आदी मान्यवर उपस्थित होते. सोमेश्वरला राज्यातील सर्वोच्च असा सर्वोत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन आणि 'सर्वोत्कृष्ट फायनान्स मॅनेजर' पुरस्कार आणि मध्य विभागातून तांत्रिक कार्यक्षमतेत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोमेश्वर कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप, व्हाईस चेअरमन बाळासाहेब कामथे, कार्यकारी संचालक राजेंद्र यादव यांनी हा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी जेष्ठ संचालक राजवर्धन शिंदे, संग्राम सोरटे, ऋषी गायकवाड, अभिजित काकडे अधिकारी कालिदास निकम, विराज निंबाळकर उपस्थित होते. तर वैयक्तिक प्रकारातून राज्यातील सर्वोच्च असा 'सर्वोत्कृष्ट फायनान्स मॅनेजर' हा पुरस्कार सोमेश्वरचे मुख्य लेखापाल योगीराज नांदखिले यांना शरद पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या मार्गदर्शनाखाली व सोमेश्वर कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांच्या नेतृत्वाखालील सोमेश्वरने तीन पुरस्कारांवर मोहोर उमटवली आहे.



# कॅलिडोस्कोप



## ट्री ऑफ ४० फ्रुट्स

*बीज तसं फळ, असा आजवरचा विचार आहे. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' असं संतमहात्म्यही सांगून गेले आहेत. मात्र अलिकडेच न्यूयॉर्कमधील सॅम वॅन अकेन नामक संशोधकाने वेगवेगळ्या ४० प्रकारची फळं लगडतील असं एक झाडं लावलं आहे. मुख्य म्हणजे अनोख्या पद्धतीने कलम तयार करण्याचा त्याचा हा प्रयोग १०० टक्के यशस्वी झाला असून या एकाच झाडाला वेगवेगळ्या ४० प्रकारची फळं लगडली आहेत. म्हणजेच हे झाड सफरचंद, आंबा, संत्री, मोसंबी, चिक्कू, चेरी आदी फळांच्या भाराने वाकलं आहे. 'ट्री ऑफ ४० फ्रुट्स' असं त्याचं नामकरण झालं असून सध्या ते अनेकांच्या औत्सुक्याचा विषय ठरतंय.*

## फोटोशूटसाठी अविवाहित मुली प्रेग्नंट!

जगात कधी काय ट्रेंड निघेल काही सांगता येत नाही. आजकाल इतक्या गोष्टी आपल्या आजुबाजूला घडत असतात, की त्या पचवनही कठीण जाते. असाच एक ट्रेंड सध्या सुरू आहे, ज्याच्याबद्दल वाचून नक्कीच धक्का बसतो. असा ट्रेंड पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे. फक्त फोटोशूटसाठी अविवाहित मुली प्रेग्नंट होऊ लागल्या आहेत. होय, कोणत्याही रिलेशनशिप अन् लग्नाशिवायच या मुली प्रेग्नंट होऊन फोटोशूट करत आहे. हा विचित्र ट्रेंड चीनमध्ये सुरू आहे.



चीन देशातील हा विचार करायला लावणारा ट्रेंड सुरू झाला आहे, जो पचनी पडणे खरच कठीण आहे. चीनमधील काही मुली अविवाहित असतानादेखील प्रेग्नंट राहून फोटोशूट करताना दिसत आहेत. सोशल मीडियावर त्यांच्या या फोटोशूटची जोरदार चर्चा सुरू आहे; पण याचा त्या मुलींवर काहीही परिणाम होताना दिसत नाही.

एका अहवालानुसार, 'सोशल मीडिया'वर काही तरुणी आणि अविवाहित मुली प्रेग्नंट होऊन फोटोशूट करताना दिसत आहेत. या मॅटर्निटी फोटोशूटमध्ये या मुली 'प्रेग्नंट' होत नसून बनावट बेबी बंप लावून फोटोशूट करत आहेत. जेन-जींचा हा नवा ट्रेंड पाहून चीनमधील पालकांनादेखील मोठा धक्का बसला आहे. चीनमधील मुलींच्या या फोटोशूटच्या मागे मुलींचा असा तर्क आहे, की त्या अजून काही दिवस लग्न करणार नाहीत; पण त्यांना त्यांच्या प्रेग्नेंसी फोटोशूटमध्ये स्लिम आणि सुंदर दिसायचे आहे. जर या मुली ३० व्या वर्षी प्रेग्नंट राहिल्या, तर त्यांच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडतील; पण २६ व्या वर्षी जर त्यांनी हे फोटोशूट केले, तर त्या आहे तशा तरुण दिसतील.

या विचाराने चीनमधील मुली आधीच त्यांचे फोटोशूट करून घेत आहेत. त्यानंतर जेव्हा त्या प्रेग्नंट होतील, तेव्हा हेच फोटो त्या शेअर करतील. सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी या ट्रेंडला प्रचंड ट्रोल केले आहे.

## चार कोटींचे घर, तरीही बेघर!

प्रत्येकाला आपल्या हक्काचे घर असावे असे वाटते. मनासारख्या ठिकाणी, मनाप्रमाणे घर असावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. त्यामुळे घर घेण्यासाठी लोक आपल्या आयुष्याची पुंजी खर्च करतात. एवढा पैसा खर्च करून घराच्या चाव्या हातात येतात, तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार उरत नाही; पण चार कोटींचे घर खरेदी करूनही बेघर असाल तर? धक्का बसला ना? एका दाम्पत्याबाबत असेच काही घडले. चार कोटींचे घर घेतल्यानंतरही हे जोडपे बेघर झाले.

ब्रिटनमध्ये राहण्याऱ्या एका जोडप्याने घरासाठी आपली आयुष्यभराची पुंजी खर्च केली. आपल्या स्वप्नातील घर मिळाल्याने त्यांच्या आनंदाला उधाण आले होते. त्यांना आता कधी आपण नव्या घरात शिफ्ट होतो असे झाले होतं. त्यानुसार ते शिफ्टही झाले; पण शिफ्ट झाल्यावर त्यांना भयंकर पश्चात्ताप झाला. आपले पैसे पाण्यात गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. असे कधी होईल, असे त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते.



वॉल्टर ब्राऊन आणि त्याची पत्नी शेरॉन यांनी हे घर विकत घेतले होते; पण घर पाहिल्यावरच त्यांना हे घर सोडून जावे लागले. ते म्हणाले, घरात गेल्यावर खिडकी उघडताच आम्हाला समोर कचऱ्याचा प्रचंड ढीग दिसला. घर खरेदी करताना आम्ही कचऱ्याचा ढिग पाहिला होता. याबाबत आम्ही डेव्हलपर्सकडे तक्रार केली होती. त्या वेळी तुम्ही हे घर खरेदी करा. पेमेंट मिळाल्यावर हा कचरा हटवण्याची जबाबदारी माझी राहील असे तो म्हणाला. पण कचऱ्याचा ढिग आहे तसाच आहे. एवढ्या रकमेत या परिसरात घर मिळणे कठीण आहे. एवढेच नव्हे, तर त्या परिसरात साधा पक्का रस्ताही नाही. कच्चे रस्ते आहेत, तरीही आम्ही कमी पैशात मिळते, म्हणून घेतले आणि आमची फसवणूक झाली, असे या जोडप्याचे म्हणणे आहे.

## जिद्दीच्या बळावर...



वयाच्या ७१ व्या वर्षी बहुसंख्य लोक आराम करत असतात. निवृत्तीनंतर आपल्या आवडीनिवडी जपत असतात. कोणी वाचन करतं, कोणी भटकंती करतं. कोणाला इतर काही छंद असतात. पण या वयात बॉडिबिल्डिंगचा विचार कोणीच करत नाही. उतारवयात शरीर साथ देत नसताना शरीरसौष्ठवाकडे कोण वळणार? मात्र सध्या ८२ वर्षांच्या असणाऱ्या अर्नेस्टाइन शेफर्ड यांनी वयाच्या ७१ व्या बॉडीबिल्डिंग सुरू केलं. त्यांच्यात तरुणांनाही लाजवेल असा उत्साह आहे. अकरा वर्षांच्या असताना एका अपघातात त्यांच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. गुडघ्याचं हाड मोडलं. ते नंतर नीट जुळलंच नाही. यामुळे त्यांचा एक पाय थोडा अधू राहिला. डॉक्टरांनी त्यांना फारसा व्यायाम न करण्याचा सल्ला दिला होता. पण त्यांनी कोणाचं काहीच ऐकलं नाही. ७१ व्या वर्षी त्यांशी भरपूर व्यायाम करून शरीर सुडौल बनवलं आणि बॉडीबिल्डिंगच्या विश्वात प्रवेश केला. पन्नाशीपर्यंत त्या गृहिणीच होत्या. एके दिवशी कुटुंबासोबत फिरायला गेल्या असताना त्यांच्या पतीने त्यांना स्वीमसूट घालायला सांगितला. त्यावेळी त्यांच्यासोबत असणाऱ्या शेफर्ड यांच्या बहिणीनेही स्वीमसूट घातला. या दोघी एकमेकींकडे पाहून हसू लागल्या. त्या खूपच बेढब दिसत होत्या. मग त्यांनी व्यायाम करण्याचा निर्णय घेतला. मधल्या काळात शेफर्ड यांच्या बहिणीचं निधन झालं. मात्र त्या मागे हटल्या नाहीत. ७१ व्या वर्षी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सरावाला सुरूवात केली. सात महिने सराव केल्यानंतर पहिल्या बॉडीबिल्डिंग स्पर्धेत सहभागी व्हायला त्या तयार झाल्या. पहिलीच स्पर्धा त्यांनी जिंकली. आता त्या प्रौढ महिलांना बॉडीबिल्डिंगचं प्रशिक्षण देतात.

## मांसभक्षक रोपटी



काही झाडं मांसभक्षक असतात. कॅनडातल्या शास्त्रज्ञांनी देशातल्या दुर्गम भागात अशा रोपट्याचा शोध लावला आहे. हे रोपटं पालीसारख्या दिसणाऱ्या सॅलामेंडर नावाच्या प्राण्याला खातं. इथल्या ॲल्गॉनकुइन पार्कमध्ये हे रोपटं सापडलं आहे. या पार्कमध्ये विविध प्रजातींची रोपटी आणि प्राणी आहेत. गेल्या दोन वर्षांपासून या परिसरात संशोधन सुरू आहे. युनिव्हर्सिटी ऑफ गुएल्फचे शास्त्रज्ञ संशोधन करत आहेत. त्यांनी कॅनडामध्ये १४४ मांसभक्षी रोपटी पाहिली आहेत. अशाप्रकारे मांसभक्षी रोपट्यांची आजवर कल्पनाच केली गेली होती. मात्र आता अशी रोपटी जगासमोर आली आहेत. पिटफॉला ट्रॅप या नावानेही हे रोपटं ओळखलं जातं. संशोधकांच्या टिमने ऑगस्ट आणि सप्टेंबर २०१८ मध्ये अशा ५८ रोपट्यांचा शोध लावला यातल्या २० टक्के रोपट्यांच्या आत सॅलामेंडरची पिल्लं अडकली होती. काही रोपट्यांमध्ये एकापेक्षा अधिक सॅलामेंडर होते. काही सॅलामेंडर जिवंत होते तर काहींचा तीन दिवसातच मृत्यू झाला होता. नायट्रोजन मिळवण्यासाठी ही रोपटी मांसभक्षक बनली असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

## फी नको, प्लास्टिक बाटल्या द्या



सध्या सगळीकडेच प्लास्टिकमुक्तीसाठी योजना राबवल्या जात आहेत. प्लास्टिकचा कचरा कमी करण्यासाठी बऱ्याच कल्पना लढवल्या जात आहेत. याचाच एक भाग म्हणून नायजेरियातल्या एका शाळेने मुलांकडून फी म्हणून प्लास्टिक बाटल्या घ्यायला सुरूवात केली. त्यामुळे मुलांना दप्तरासोबतच प्लास्टिक बाटल्यांनी भरलेली पिशवीही न्यावी लागते. या बाटल्यांचं वजन केल्यानंतर मिळणारी किंमत त्यांच्या एकूण फीमधून वजा केली जाते. या उपक्रमामुळे कुटुंबावरचा आर्थिक बोजा कमी झाला शिवाय देशही प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने वाटचाल करू लागला. आफ्रिकन क्लीन अप मोहिमेअंतर्गत हा उपक्रम राबवण्यात येत असून रिसायकलिंग करणाऱ्या संस्थांचं सहकार्यही यासाठी घेतलं जात आहे. इथल्या मॉरिट इंटरनॅशनल स्कूलने यासाठी पुढाकार घेतला आहे. इतर काही शाळांमध्येही अशाप्रकारे प्लास्टिक बाटल्या स्वीकारल्या जातील. आर्थिक बोजा कमी झाल्यामुळे पालकही खूश आहेत. मुलांनाही आता शिक्षण अर्धवट सोडावं लागणार नाही. म्हणजेच एकाच योजनेमुळे दोन लाभ झाले आहेत.

## स्मार्टफोन ठेवा बाजूला!

स्मार्टफोनच्या वाढत्या वापरामुळे लोकांमधला परस्पर संवाद कमी होत चालला आहे. जेवणाच्या टेबलवरही लोक मोबाईलशीच खेळत असतात. कोणी चॅट करत असतं तर कोणी व्हिडिओ बघत असतं.



यामुळे कुटुंब, मित्रमैत्रिणी यांच्यातला संवाद कमी होत चालला आहे आणि विसंवाद वाढत चालला आहे. याबद्दल बरीच ओरड होत असली तरी लोक मोबाईलचा वापर करत रहातात. अमेरिकेतल्या एक पिझ्झा रेस्टॉरंटने यावर एक नामी उपाय शोधून काढला आहे. इथे येणाऱ्या ग्राहकांनी आपला फोन लॉकरमध्ये जमा करायचा आणि मोफत पिझ्झा खायचा अशी ही ऑफर आहे. कंपनी एक पिझ्झा मोफत देते. लोकांमधला संवाद वाढणं गरजेचं असल्यामुळे आम्ही हा उपक्रम सुरू केल्याचं रेस्टॉरंट व्यवस्थापनाचं म्हणणं आहे. काही काळ तरी लोकांनी मोबाईलपासून दूर रहायला हवं. यासाठी त्यांना थोडी प्रलोभनं दाखवणं गरजेचं आहे. या रेस्टॉरंटमध्ये आलेल्या मोठ्या गटाला ही सवलत मिळते. या गटातल्या प्रत्येकाने आपला मोबाईल लॉकरमध्ये जमा करायचा असतो. साधारण तीन आठवड्यांपूर्वी हा उपक्रम सुरू झाला. त्याला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. लोकांनी मोबाईल न वापरण्याची सवय कायम ठेवावी, असं कंपनीचं म्हणणं आहे. खरं तर मोबाईलचा वापर कमी करायचा असं प्रत्येकाने ठरवायला हवं. मात्र त्यासाठी अशी प्रलोभनं दाखवण्याची वेळ येणं ही धोक्याची घंटा म्हणायला हवी.

## कारवाई कंपनीच्या अंगलट

कंपनीने केलेली कारवाई त्याला महागात पडली. मेट्रो वेबसाइटच्या रिपोर्टनुसार, १८ वर्षांची मुलगी एलिझाबेथ बेनासी एका ब्रिटिश कंपनीत नव्याने भरती झाली होती आणि तिने तिथे मेहनतीने काम केले; मात्र तीन महिन्यांनंतर तिच्यासोबत असे काही घडले, की कंपनीने तिला नोकरीवरून काढून टाकले आणि त्यावर तिने स्पोर्टस्? शूज घालून ऑफिसमध्ये आल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे तिच्यावर ही कारवाई करण्यात आली.


मुलीला कंपनीचा हा निर्णय मान्य नव्हता. त्यानंतर तिने याबाबत न्यायालयात धाव घेतली. न्यायालयात एलिझाबेथ या मुलीने न्यायाधीशांना सांगितले, की लोक स्पोर्टस्? शूज घालून ऑफिसमध्ये जात नाहीत, हे मला माहीत नव्हते. तथापि, माझ्या या चुकीबद्दल माझ्या बॉसने मला फटकारले आणि माझ्याशी असे वागले. जणू काही मी नोकरदार नसून लहान मुलगी आहे. याशिवाय न्यायाधीशांसमोर जबाब देताना तरुणीने तिथे काम करणारे लोक मला अनेकदा टार्गेट करत असतात, असे सांगितले. तिच्या वयामुळे आपल्याला पीडित बनवले जात असल्याच्या कारणावरुन त्याने कंपनीवर दावा दाखल केला; मात्र त्याची कामगिरी चांगली नसल्यामुळे त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आल्याचे कंपनीने न्यायालयात आपले म्हणणे मांडले. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायाधीशांनी मुलीच्या बाजूने निकाल दिला. कंपनीने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना समान वागणूक द्यायला हवी, इतर कर्मचारीही स्पोर्टस्? शूज घालून कार्यालयात येत असताना मग एलिझाबेथला तशीच वागणूक का नाही, असे न्यायालयाने विचारले. या प्रकरणात एलिझाबेथला ३२ लाख रुपयांची भरपाई द्यावी, असे आदेश न्यायालयाने दिले.



## हिवाळ्यात पाऊस का पडतो?

दिल्ली-एनसीआरसह देशातील अनेक भागात पाऊस पडत आहे. पावसामुळे थंडी आणखी वाढली आहे. हवामान खात्याने पावसासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

साधारणतः उन्हाळ्यात वाढत्या तापमानात वाढत्या आर्द्रतेमुळे पावसाळी परिस्थिती निर्माण होते; पण डिसेंबर महिन्यात पाऊस का पडतो, असा प्रश्न



पडतो. हिवाळ्यातही पाऊस पडतो; पण तो फारच कमी असतो. यामागेही एक कारण आहे. हिवाळ्यात पडणाऱ्या पावसाला जबाबदार कोण, या पावसाचा फायदा कोणाला होणार आणि कोणाचे नुकसान होणार हे जाणून घेऊया. हिवाळ्यात पाऊस पडण्याचे कारण म्हणजे वेस्टर्न डिस्टर्बन्स. भूमध्य प्रदेशात कमी दाबाचे वादळ निर्माण होते. त्याचे वारे उत्तर-पश्चिम दिशेला जातात आणि वातावरणासोबत पाऊस आणि बर्फवृष्टी निर्माण करणारी परिस्थिती निर्माण होते. धुके वाढते. धुके आणि हिमवर्षाव होतो; परंतु दरवर्षी पाऊस पडतोच असे नाही.

हिवाळ्यात पडणाऱ्या पावसाचा थेट परिणाम तापमानावर होतो. हिमालयीन प्रदेशातून येणाऱ्या थंड हवेमुळे मैदानी भागात तापमान आणखी घसरते. अशा प्रकारे तापमान घसरल्याने थंडी वाढते. साधारणपणे हिवाळ्यात कोरडेपणा असतो; पण पाऊस पडल्यानंतर आर्द्रतेचे प्रमाण वाढते. त्यामुळे थंडी आणखी वाढते. यामुळेच अशा हवामानात अधिक सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

या पावसाचा थेट फायदा रब्बी पिकांना होतो. रब्बी पिकासाठी पाऊस अत्यावश्यक मानला जातो. यामुळे शेतात ओलावा टिकून राहतो. पावसामुळे पोषक द्रव्ये जमिनीत विरघळतात, जी झाडांपर्यंत पोचतात; मात्र मर्यादित प्रमाणात पाऊस पडल्यासच फायदा होतो. पावसामुळे जड कण कमी होतात आणि हवेची गुणवत्ता सुधारते. पावसाळ्यानंतर नद्या आणि तलावांची पाणी पातळी हळूहळू कमी होत जाते. हिवाळ्यात पावसाचे फायद्यांसोबतच काही तोटेही आहेत. विशेषतः डोंगराळ भागात पावसामुळे भूस्खलनाचा धोका वाढतो. वाहतुकीचा वेग मंदावतो. दळणवळणात अडथळे निर्माण होतात हिवाळ्यातील पावसामुळे हवेतील आर्द्रता वाढते, ज्यामुळे धुके अधिक दाट होऊ शकते.

## उंदरांसाठी बांधलं घर



आजच्या युगात प्रत्येक जण स्वत:च्या स्वार्थाचा विचार करतो. या पृथ्वीवर रहाणाऱ्या इतर जीवजंतूंबाबत फारसा विचार केला जात नाही. या पृथ्वीतलावरचे अनेक जीव आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. झाडं तोडली जात आहेत. मात्र अशा परिस्थितीतही काही लोक धीर सोडायला तयार नाहीत. ही मोजकी मंडळी पर्यावरण वाचवण्यासाठी झटत असतात. इतरांनाही आधार देतात. ब्रिटनमधला प्रसिद्ध वाईल्ड लाईफ फोटोग्राफर सायमन अशाच काही लोकांपैकी एक. त्यांनी आपल्या घराच्या बागेत उंदरांसाठी घर तयार केलं आहे. इथे राहणाऱ्या उंदरांना ते फळं आणि इतर खाद्यपदार्थ देतात. एके दिवशी बागेत काम करत असताना डेल यांना उंदिर दिसला. तेवढ्यात एक मांजर आलं. हे मांजर उंदराकडे बघत होतं. मांजर उंदराची शिकार करणार असल्याचं बघून त्यांनी घरातून एक बॉक्स आणला आणि उंदरासाठी घर तयार केलं. डेल यांनी उंदराचं नाव जॉर्ज ठेवलं. हा जॉर्ज या घरात रहायला आला. त्यानंतर इतर काही उंदिर रहायला आले. त्यांचं कुटुंब वाढत गेलं. मग डेल यांनी अजून खोल्या तयार केल्या. या खोल्या आतून एकमेकांशी जोडलेल्या आहेत. आता इथे भरपूर उंदिर आहेत. उंदरांचं गावच इथे वसलं आहे.

## At a Glance

### इम्रान खान यांचे शिक्षेला आव्हान



**पुणे :** इस्लामाबाद : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान आणि त्यांच्या पत्नी बुशरा बीबी यांनी अल-कादिर ट्रस्ट प्रकरणी सुनावलेल्या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.इस्लामाबादमधील एका उत्तरदायित्व न्यायालयाने या महिन्याच्या सुरुवातीला बहुप्रतीक्षित निकाल देताना १९० दशलक्ष ब्रिटिश पौंड ंच्या बहुप्रतीक्षित निर्णयात माजी पहिल्या जोडप्याला दोषी ठरवले.

### एसटी महामंडळाचा मोठा निर्णय

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) पुढील पाच वर्षांसाठी दरवर्षी पाच हजार बसखरेदी करणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी केली. या बसेस महामंडळाच्या मालकीच्या असतील, असे त्यांनी सांगितले.

### दोन चोरट्यांना दिल्लीत अटक

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी घरफोडीच्या गुन्ह्याचा उलगडा करण्याचा दावा केला असून दोन जणांना अटक केली असून ३० लाख रुपये किमतीचे चोरीचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले आहेत.

# मुख्य उत्तराखंडने रचला इतिहास

## समान नागरी कायदा लागू करणारे ठरले पहिले राज्य


■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** उत्तराखंड राज्याने सोमवारी इतिहास रचला. उत्तराखंड हे समान नागरी संहिता लागू करणारे पहिले राज्य ठरले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तराखंड भेटीच्या अगदी आधी दुपारी १२.३० वाजता हा ऐतिहासिक कायदा लागू केला गेला. संपूर्ण उत्तराखंडमध्ये यूसीसी लागू केला जाणार आहे. हा कायदा राज्याबाहेर राहणाऱ्या उत्तराखंडमधील रहिवाशांनाही लागू होईल. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी या कार्यक्रमाचे नेतृत्व करतील. एक दिवस आधी (२६ जानेवारी), सीएम धामी म्हणाले होते की, यूसीसी धर्म, लिंग, जात किंवा समुदायाच्या आधारावर भेदभाव न करता सुसंवादी समाजाचा पाया रचेल. उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा आजपासून लागू झाल्याची उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी घोषणा केली. समान नागरी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री धामी यांनी यूसीसी पोर्टलचं अनावरण केलं.

देशात प्रथमच समान नागरी कायद्याची अंमलबजावणी होणार असल्यानं उत्तराखंड सरकारनं अडीच वर्षांपासून तयारी सुरू केली होती. राज्यात समान नागरी कायदा हा आज दुपारी साडेबारा वाजता लागू झाला आहे.

धामी सरकारनं २०२२ मध्ये यूसीसीचा मसुदा तयार करण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन केली होती. कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी उत्तराखंड सरकारनं २७ मे २०२२ रोजी तज्ज्ञ समिती स्थापन केली. यानंतर, २ फेब्रुवारी २०२४ रोजी या समितीनं सरकारला आपला अहवाल सादर केला. सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश रंजना प्रकाश देसाई हे समितीच्या अध्यक्ष होत्या. त्यांच्यासोबत, समितीमध्ये दिल्ली उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश प्रमोद कोहली, उत्तराखंडचे माजी मुख्य सचिव शत्रुघ्न सिंह, करदात्या संघटनेचे मनु गौर आणि शिक्षणतज्ज्ञ सुरेखा डांगवाल यांचा समावेश होता. समितीनं दिलेला अहवाल स्वीकारल्यानंतर उत्तराखंडच्या विधानसभेत ८ मार्च २०२४ रोजी समान नागरी कायदा मंजूर करण्यात आला. तज्ज्ञ समितीनं विविध माध्यमांद्वारे लोकांशी संपर्क साधून त्यांच्या सूचना स्वीकारल्या आहेत. समितीला यूसीसीसाठी ४९ लाख सूचना एसएमएसद्वारे मिळाल्या आहेत. या सगळ्याचा विचार करुन आज अंतिम कायदा लागू करण्यात आला.

भारतीय संविधानात गोव्याला विशेष राज्याचा दर्जा आहे. तसेच, संसदेने गोव्याला पोर्तुगीज नागरी संहिता लागू करण्याचा अधिकार देणारा कायदा केला. म्हणून, गोवा हे एकमेव राज्य आहे जिथे UCC लागू आहे. आता उत्तराखंड हे स्वातंत्र्यानंतर समान नागरी कायदा लागू करणारे पहिले राज्य बनणार आहे.






### काय होणार बदल?

- युसीसी कुणासाठी - उत्तराखंडचे नागरिक राज्याबाहेर राहात असले तरी त्यांना यूसीसी लागू होणार आहे.
- विवाह विषयक नियम - समान नागरी कायद्यात विवाह नोंदणी, घटस्फोट, वारसा संबंधित तरतुदी कायम ठेवण्यात आल्या आहेत.
- विवाह आणि धर्म - युसीसी अंतर्गत सर्वच धर्मांच्यात बहुपत्नीत्वावर बंदी असणार आहे. याचाच अर्थ कोणत्याही व्यक्तीला दोन विवाह करता येणार नाहीत.
- वारसा हक्क - युसीसी कायद्यानुसार मुलगा आणि मुलीला मालमत्तेचा समान हक्क असणार आहे.
- लग्नाचे वय - यूसीसीनुसार लग्नासाठी मुलांसाठी किमान वय २१ आणि मुलींसाठी १८ वर्षे किमान वय असावे. लग्न कसेही करा, सर्व धर्मांसाठी विवाह नोंदणी अनिवार्य.
- लिव्ह-इन रिलेशनशिपचे नियम - लिव्ह-इन रिलेशनशिपसाठी नोंदणी अनिवार्य. मात्र १८ ते २१ वर्षांखालील लिव्ह-इन करता, पालकांची संमती आवश्यक असेल.
- लिव्ह-इन रिलेशनशिपमधून जन्मलेल्या मुलांचे हक्क - या मुलांना विवाहित जोडप्यांच्या मुलांसारखेच हक्क असतील.
- दत्तक धोरण - मूल दत्तक घेणे सर्व धर्मांसाठी खुले असेल, परंतु दुसऱ्या धर्मातील मूल दत्तक घेण्यास मनाई राहील.
- प्रथा रद्द करणे : राज्यात 'हलाला' आणि 'इद्दत' सारख्या प्रथांना आता परवानगी राहणार नाही.

### समान नागरी संहिता म्हणजे काय?

- समान नागरी संहिता (यूसीसी) म्हणजे देशात राहणाऱ्या सर्व नागरिकांसाठी (प्रत्येक धर्म, जात, लिंगाचे लोक) समान कायदा असणे. जर एखाद्या राज्यात नागरी कायदा लागू झाला तर लग्न, घटस्फोट, मूल दत्तक घेणे, मालमत्तेचे विभाजन तसेच लिव्ह-इन रिलेशनशिप अशा सर्व बाबींमध्ये प्रत्येक नागरिकासाठी समान कायदा असेल. लग्नासोबतच लिव्ह-इन जोडप्यांना नोंदणी करणे अनिवार्य असेल.

# शेअर बाजारात मोठी घसरण

**मुंबई :** सोमवारी भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेन्सेक्स ८२४ अंकांनी घसरला. निफ्टी २६३ अंकांनी घसरला आणि २२,८०० च्या जवळ बंद झाला. लहान आणि मध्यम समभागांमध्ये तीव्र घसरण दिसून आली. मिडकॅप निर्देशांक २.६८ टक्क्यांनी घसरला. तर स्मॉलकॅप निर्देशांक ३.५१ टक्क्यांनी घसरला. त्यामुळे शेअर बाजारातील गुंतवणूकदारांच्या संपत्तीत आज ९ लाख कोटी रुपयांची घट झाली आहे. बाजारात सर्वांगीण घसरण झाली. बीएसईवर आयटी, टेलिकॉम, कमोडिटी, फार्मा, युटिलिटी, कंझ्युमर ड्युरेबल्स, मेटल आणि पॉवर शेअर्सचे निर्देशांक २ ते ३ टक्क्यांनी घसरले.


**कार्यालयाचे नाव- वनपरिक्षेत्र कार्यालय, जुन्नर**
**निविदा सूचना क्र. 05/2024-25**

खालील कामाच्या सिलबंद निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी जुन्नर, तहसिल कार्यालयाजवळ, मु. पो. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे - 410 502 हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन मागवित आहेत. कोऱ्या निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी जुन्नर कार्यालयामध्ये प्रसिध्दी फलकावर दि. 28/01/2025 ते 08/02/2025 या कालावधी मध्ये भरुन हार्ड कॉपीचे स्वरूपात भरावयाच्या आहेत व भरून पाठविलेल्या निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी जुन्नर यांचे कार्यालयात दि. 09/02/2025 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत स्विकारले जातील आणि दि. 09/02/2025 रोजी सिलबंद निविदा लिफापे छाननीसाठी उघडले जातील. त्यास खालीलप्रमाणे कामाच्या अटी व शर्ती लागू राहतील.
कामाचे संक्षिप्त वर्णन - खालीलप्रमाणे

| अ. क्र. | योजनेचे नांव | कामाचा तपशिल | निविदा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (2406 2232) | Constructing of Ferrocement Tree No. 1 Shivneri Cages No. 1 at MLRC | 842421 | सर्वसाधारण खुला |
| 2 | | Constructing of Ferrocement Tree No. 1 Shivneri Cages No. 2 at MLRC | 842084 | |
| 3 | | Constructing of Ferrocement Tree No. 2 Shivneri Cages No. 1 at MLRC | 841990 | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| 4 | | Constructing of Ferrocement Tree No. 2 Shivneri Cages No. 2 at MLRC | 842267 | |

1) निविदाकारांनी सावधानता बाळगून निविदा सादर करण्याच्या किमान 1 दिवस आधी सर्व प्रक्रिया पुर्ण करण्याची दक्षता घ्यावी. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज संबंधित कार्यालयात सादर करणे अनिवार्य राहिल. अन्यथा निविदा स्विकारण्यात येणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.
2) सदर कामाबाबत बी-1 फॉर्म हा वनपरिक्षेत्र अधिकारी जुन्नर येथून निविदाधारक यांनी प्राप्त करून घ्यावा.
3) निविदा धारकानी वनकर्मचारी यांच्या सोबतच्या स्थळ पाहणी अहवाल जोडणे अनिवार्य राहिल.
4) ज्या निविदाकारांनी निविदा मंजूर झालेले आहे त्या निविदाकाराने सदर कामाचे आदेश प्राप्त होताच 3 दिवसांत काम सुरू करण्यात यावे अन्यथा सदर निविदा रद्द करण्यात येईल.
5) सदर कामाचा कालावधी कार्यारंभ आदेशानंतर 30 दिवस असेल, कोणत्याही परिस्थितीत सदर कामास मुदतवाढ देण्यात येणार नाही.
6) शासन निर्णयान्वये शासनाने नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्ती सदर निविदेस लागू असतील.
7) सदर कामांची एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
8) एका कामाची निविदा फॉर्मची रक्कम 500/- रूपये एवढी राहिल व अनामत रक्कम 1 टक्के एवढी राहिल.

**प्रदीप चव्हाण,**
वनपरिक्षेत्र अधिकारी, जुन्नर,


# चंद्रपूरच्या जंगलातून कुख्यात राजगोंडला अटक

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**चंद्रपूर :** वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात असलेल्या बहेलिया टोळीतील अजित राजगोंड याला चंद्रपूरातील जंगलातून अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात झालेल्या अनेक वाघांच्या त्यानं शिकारी केल्याचा संशय आहे. अशातच वाघांसाठी नंदनवन ठरलेल्या चंद्रपूरातून त्याला अटक करण्यात आल्यानं एकच खळबळ उडाली आहे. वनविभागाने याची पुष्टी केली असून या प्रकरणी त्याची चौकशी सुरू आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ताडोबा अंधारी व्याघ्रप्रकल्पासह परिसरात १०० हून अधिक वाघ आहेत. त्यामुळे येथे मानव-वन्यजीव संघर्ष शिगेला पोचला आहे. अशातच वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात असलेला आरोपी अजित राजगोंड याला चंद्रपूर जिल्ह्यात पकडण्यात आलं. वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात असलेला आरोपी अजित राजगोंड हा चंद्रपूरात सापडल्यानं वनविभागाला सखोल तपास करावा लागणार आहे.

बहेलिया टोळी शिकारीसाठी कुख्यात- मध्यप्रदेश येथील बहेलिया टोळी ही वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात आहे. वाघांची शिताफीनं शिकार करण्यात ही टोळी तरबेज आहे. या टोळीनं देशभरातील अनेक वाघांची शिकार केली आहे. एवढंच नव्हे तर या टोळीचं आंतरराष्ट्रीय कनेक्शन असल्याचंही समोर आलं. २० वर्षांपूर्वी चंद्रपूर जिल्ह्यात बहेलिया टोळीचा वावर होता. त्यानंतर त्यांचं अस्तित्व फारसं दिसून आलं नाही. असे असले तरी तरीही चंद्रपूर जिल्ह्यात काही ठिकाणी वाघांची शिकार झाल्याचं समोर आलं होतं. २०२१ मध्ये वाघांच्या अवयवाची तस्करी करताना नागपूर येथील बुट्टीबोरी वनविभागानं काही आरोपींना अटक केली होती.


**जाहीर नोटीस**
दौंड येथील मे. उपविभागीय अधिकारी, दौंड यांचे कोर्टात पिठासन अधिकारी श्री. मिनाज मुल्लासो

सौ. विमल तायराम गायकवाड -अर्जदार
विरुध्द
कोणी नाही -जाब देणार

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडिल बाबु लिंबा थोरात यांचा मृत्यू दिनांक ३०/०८/१९७६ रोजी गिरीम, ता. दौंड, जि. पुणे येथे राहत्या घरी झाला असून, त्यांचे मृत्यूची नोंद ग्रामपंचायत गिरीम यांचे दप्तरी नसलेने सदर मृत्यू नोंद होणेबाबत परवानगी मिळणेसाठी व तसा मृत्यू दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांचे वडिलांचा मृत्यू दाखला मिळणेचा आदेश बाबत मागणी केलेली आहे.

तरी या जाहिर नोटीसीद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील नेमलेली दिनांक २८/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत स्वतः अगर वकिलांमार्फत लेखी हरकत मा.उपविभागीय अधिकारी, दौंड यांचेकडे किंवा मा.मंडल अधिकारी, दौंड यांचेकडे नोंदवावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरहू अर्जदार यांना त्यांचे वडिलांच्या मृत्यूचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस असे.
दौंड.
दिनांक:- २७/०१/२०२५
शिक्का

सही/-
**ॲड. राजेंद्र बोडखे**
नोटरी (भारत सरकार),प्रदिप प्लाझा, दौंड (पुणे)
मो.नं. ९४२२००६९७७ / ९०२८००६९७७



महाराष्ट्र शासन वन विभाग
**वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, खेड (प्रा)**
ता. खेड, जि. पुणे ४१०५०५
**निविदा सुचना क्र. २ सन २०२४-२५**

खालील कामांच्या सीलबंद निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय खेड (प्रा.) ता. खेड, जि. पुणे ४१०५०५ हे महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागवित आहेत. को-या निविदा या वनपरिक्षेत्र खेड कार्यालयामध्ये मिळतील. सदरच्या निविदा दिनांक २७-०१-२०२५ ते ०४- ०२-२०२५ या कालावधीमध्ये भरून हार्ड कॉपीचे स्वरुपात भरावयाच्या आहेत. सदरच्या भरलेल्या निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय खेड (प्रा.) यांचे कार्यालयामध्ये दिनांक-०४.०१.२०२५ रोजी दुपारी ०४:०० वा पर्यंत स्विकारणेत येतील व त्याच दिवशी सायंकाळी ०५:०० वा उघडणेत येतील.

| अ.क्र | कामाचा तपशिल | परिमाण | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | Construction of Concrete Boundary Piller At Kadus (ranmala) Arround Forest Compartment No 2701 In khed Range of junnar forest Division | 1 | 508600 | सु बे अ |
| 2. | Construction of Concrete Boundary Piller At shiroli Arround Forest Compartment No 387,388 In khed Range of junnar forest Division | 1 | 752100 | सु बे अ |
| 3. | Construction of Concrete Boundary Piller At kalechiwadi Arround Forest Compartment No 275 In khed Range of junnar forest Division | 1 | 990600 | सु बे अ |
| 4. | Construction of Concrete Boundary Piller At warchi bhuburwadi Arround Forest Compartment No 271 In khed Range of junnar forest Division | 1 | 994100 | सु बे अ |
| 5. | Construction of Concrete Boundary Piller At khalchi bhuburwadi Arround Forest Compartment No 270 In khed Range of junnar forest Division | 1 | 981400 | सु बे अ |
| 6. | Construction of Concrete Boundary Piller At chinchbaiwadi Arround Forest Compartment No 263 In khed Range of junnar forest Division | 1 | 999500 | सु बे अ |
| 7. | Construction of Concrete Boundary Piller At jaulake bk Arround Forest Compartment No 261 In khed Range of junnar forest Division | 1 | 93100 | सु बे अ |
| 8. | Construction of Concrete Boundary Piller At tekawade Arround Forest Compartment No 316 In khed Range of junnar forest Division | 1 | 370800 | सु बे अ |
| 9. | Construction of Concrete Boundary Piller At shirgaon Arround Forest Compartment No 314 In khed Range of junnar forest Division | 1 | 576200 | सु बे अ |
| 10. | Construction of Concrete Boundary Piller At wanjale Arround Forest Compartment No 312 In khed Range of junnar forest | 1 | 240500 | खुला वर्ग |
| 11. | Construction of Concrete Boundary Piller At madoshi Arround Forest Compartment No 315 In khed Range of junnar forest Division | 1 | 103500 | खुला वर्ग |
| 12. | Construction of Concrete Boundary Piller At dhamangaon khurd Arround Forest Compartment No 306 In khed Range of junnar forest Division | 1 | 295600 | खुला वर्ग |
| 13. | Construction of Concrete Boundary Piller At dhamangaon bk Arround Forest Compartment No 304 In khed Range of junnar forest Division | 1 | 314700 | खुला वर्ग |
| 14. | Construction of Concrete Boundary Piller At shedurli Arround Forest Compartment No 305 In khed Range of junnar forest Division | 1 | 329600 | खुला वर्ग |
| 15. | Construction of Concrete Boundary Piller At valad Arround Forest Compartment No 303 In khed Range of junnar forest Division | 1 | 429800 | खुला वर्ग |
| 16. | Construction of Concrete Boundary Piller At karkundi Arround Forest Compartment No 317 In khed Range of junnar forest Division | 1 | 282350 | खुला वर्ग |
| 17. | Construction of Concrete Boundary Piller At bhivegaon Arround Forest Compartment No 318 In khed Range of junnar forest Division | 1 | 731200 | खुला वर्ग |
| 18. | Construction of Concrete Boundary Piller At gandalwadi Arround Forest Compartment No 299 In khed Range of junnar forest Division | 1 | 511300 | खुला वर्ग |

**वन परिक्षेत्र अधिकारी खेड (प्रा)**



महाराष्ट्र शासन वन विभाग
**वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, मंचर (प्रा)**
वनसावित्री उद्यान, अवसरी घाट ता आंबेगाव ता. आंबेगाव, जि. पुणे-४१२४७०५
**निविदा सुचना क्र. २ सन २०२४-२५**

खालील कामांच्या सीलबंद निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय मंचर (प्रा.) वनसावित्री उद्यान, अवसरी घाट ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२४०५ हे महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागवित आहेत. को-या निविदा या वनपरिक्षेत्र मंचर कार्यालयामध्ये मिळतील. सदरच्या निविदा दिनांक २७-०१-२०२५ ते ०४-०१-२०२५ या कालावधीमध्ये भरून हार्ड कॉपीचे स्वरुपात भरावयाच्या आहेत. सदरच्या भरलेल्या निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय मंचर (प्रा.) यांचे कार्यालयामध्ये दिनांक- ०४.०१.२०२५ रोजी दुपारी ०४:०० वा पर्यंत स्विकारणेत येतील व त्याच दिवशी सायंकाळी ०५:०० वा उघडणेत येतील.

| अ.क्र | कामाचा तपशिल | परिमाण | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | Construction of Concrete Boundary Piller At Tambdemala Arround Forest Compartment No 220 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 627500 | सु बे अ |
| 2. | Construction of Concrete Boundary Piller At Bhorwadi Arround Forest Compartment No 221 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 89800 | सु बे अ |
| 3. | Construction of Concrete Boundary Piller At vayalmala Arround Forest Compartment No 223 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 537400 | सु बे अ |
| 4. | Construction of Concrete Boundary Piller At Pargaon Tarfe Khed Arround Forest Compartment No 224 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 448300 | सु बे अ |
| 5. | Construction of Concrete Boundary Piller At Walujwadi Arround Forest Compartment No 218 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 492900 | सु बे अ |
| 6. | Construction of Concrete Boundary Piller At choundoli Bk Arround Forest Compartment No 218 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 322300 | सु बे अ |
| 7. | Construction of Concrete Boundary Piller At rajani Arround Forest Compartment No 238 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 343500 | सु बे अ |
| 8. | Construction of Concrete Boundary Piller At Avsari Bk Arround Forest Compartment No 247 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 724100 | सु बे अ |
| 9. | Construction of Concrete Boundary Piller At Gawadewadi Arround Forest Compartment No 248 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 859400 | सु बे अ |
| 10. | Construction of Concrete Boundary Piller At Jadhavwadi Arround Forest Compartment No 237 In Manchar Range of junnar forest | 1 | 65200 | सु बे अ |
| 11. | Construction of Concrete Boundary Piller At Mandalwadi Arround Forest Compartment No 260a In Manchar Range of junnar forest Division | 1 | 634000 | सु बे अ |
| 12. | Construction of Concrete Boundary Piller At Mandalwadi Arround Forest Compartment No 260b In Manchar Range of junnar forest Division | 1 | 317700 | सु बे अ |
| 13. | Construction of Concrete Boundary Piller At Dhamani Arround Forest Compartment No 256 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 317700 | सु बे अ |
| 14. | Construction of Concrete Boundary Piller At Lakhangaon Arround Forest Compartment No 252 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 717800 | सु बे अ |
| 15. | Construction of Concrete Boundary Piller At Lakhangaon Arround Forest Compartment No 252 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 407900 | सु बे अ |
| 16. | Construction of Concrete Boundary Piller At Pondhewadi Arround Forest Compartment No 253 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 466100 | खुला वर्ग |
| 17. | Construction of Concrete Boundary Piller At Pondhewadi Arround Forest Compartment No 253 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 711100 | खुला वर्ग |
| 18. | Construction of Concrete Boundary Piller At kothapur Arround Forest Compartment No 250 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 439200 | खुला वर्ग |
| 19. | Construction of Concrete Boundary Piller At Shakore Arround Forest Compartment No 228 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 226800 | खुला वर्ग |
| 20. | Construction of Concrete Boundary Piller At thorandale Arround Forest Compartment No 239 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 550200 | खुला वर्ग |
| 21. | Construction of Concrete Boundary Piller At kalnmb Arround Forest Compartment No 232 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 460600 | खुला वर्ग |
| 22. | Construction of Concrete Boundary Piller At kalnmb Arround Forest Compartment No 232 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 782100 | खुला वर्ग |
| 23. | Construction of Concrete Boundary Piller At vitthalwadi Arround Forest Compartment No 230 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 184900 | खुला वर्ग |
| 24. | Construction of Concrete Boundary Piller At sakore Arround Forest Compartment No 228 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 276500 | खुला वर्ग |
| 25. | Construction of Concrete Boundary Piller At kadewadi chas Arround Forest Compartment No 227 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 184900 | खुला वर्ग |
| 26. | Construction of Concrete Boundary Piller At khadaki Arround Forest Compartment No 236 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 414700 | खुला वर्ग |
| 27. | Construction of Concrete Boundary Piller At khadakwadi Arround Forest Compartment No 257 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 366600 | खुला वर्ग |
| 28. | Construction of Concrete Boundary Piller At khadakwadi Arround Forest Compartment No 249 In Manchar Range of junnar forest Division | 1 | 826000 | खुला वर्ग |

**वन परिक्षेत्र अधिकारी मंचर (प्रा)**



**SINHGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY**
19/15, Erandwane, Smt. Khilare Marg, Off. Karve Road,
Pune - 411004 Phone: 020 - 25431001 Website: www.sinhgad.edu
Sinhgad Institutes

**WANTED**

Applications are invited from eligible candidates for the appointment to the following posts for the Academic Year 2024-25 on Ad hoc basis to be filled in our **following Institutes** under **Sinhgad Technical Education Society** (STES) Approved by AICTE / Pharmacy Council of India; Recognized by Government of Maharashtra and Affiliated to Savitribai Phule Pune University.

**— Engineering —**
1) **Sinhgad College of Engineering**, Vadgaon-Ambegaon (Bk), Pune – 411041
2) **Smt. Kashibai Navale College of Engineering**, Vadgaon-Ambegaon (Bk), Pune – 411041.
3) **NBN Sinhgad Technical Institute Campus**, Vadgaon-Ambegaon (Bk), 411041
4) **Sinhgad Institute of Technology and Science**, Narhe, Pune - 411041
5) **Sinhgad Academy of Engineering,** Kondhawa, Pune-411048.
6) **RMD Sinhgad Technical Institute Campus**, Warje- 411052
7) **Sinhgad Institute of Technology**, Lonavala - 410401
8) **SKN Sinhgad Institute of Technology and Science**, Kusgaon (Bk), Lonavala, Dist. Pune - 411401

| Sr. No. | Post | Branch / Subject |
|---|---|---|
| 1. | Professor | Mechanical, Civil, Bio Technology, Chemical Engineering, Computer, IT, E&TC, Electrical, Physics, Chemistry, Mathematics |
| 2. | Associate Professor | |
| 3. | Assistant Professor | |

**— Management —**
1) **Sinhgad Institute of Management**, Vadgaon-Ambegaon (Bk.), Pune – 411041
2) **Smt. Kashibai Navale Sinhgad School of Business Management**, Ambegaon (Bk), Pune – 411041
3) **Sinhgad Institute of Management & Computer Application**, Narhe, Pune – 411041
4) **Sinhgad Institute of Business Administration & Research**, Kondhwa (Bk), Pune - 411048
5) **Sinhgad Business School**, Erandwane, Karve Road, Pune – 411004
6) **Sinhgad Institute of Business Administration & Computer Application**, Kusgaon (Bk), Lonawala, Dist. Pune - 411401

| Sr. No. | Post | Programmes |
|---|---|---|
| 1. | Professor | MBA MCA |
| 2. | Associate Professor | |
| 3. | Assistant Professor | |

**— Pharmacy —**
1) **Sinhgad College of Pharmacy**
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041
2) **Sinhgad Institute of Pharmacy**
Narhe, Off Westerly Bypass Road, Pune - 411 041
3) **Smt. Kashibai Navale College of Pharmacy**
Kondhwa (Bk), Kondhwa - Saswad Road, Pune - 411048
4) **Sinhgad Institute of Pharmaceutical Sciences**
Kusgaon (Bk), Lonavala, Dist. Pune - 410401

| Sr. No. | Post | Subjects |
|---|---|---|
| 1. | Professor | Pharmaceutics, Pharmaceutical Chemistry |
| 2. | Associate Professor | Pharmacology, Pharmacognosy |
| 3. | Assistant Professor | Pharmaceutical Quality Assurance |

**— Under Graduate / Post Graduate —**
1) **Sinhgad College of Science**
Ambegaon (Bk), Pune – 411046
2) **Sinhgad College of Arts & Commerce**
Warje, Pune – 411052
3) **Sinhgad College of Commerce**
Kondhwa (Bk), Pune – 411048
4) **Smt. Kashibai Navale College of Commerce**
Erandwane, Pune – 411004
5) **N. B. Navale College of Commerce & Science**
Kusgaon (Lonavala), Dist. Pune – 410401.

| Sr. No. | Post | Programmes |
|---|---|---|
| 1. | Professor | Computer Science, B.B.A., B.C.A., Commerce |
| 2. | Associate Professor | |
| 3. | Assistant Professor | |

**Eligibility & Experience** : Qualification, Experience and Pay Scale shall be as applicable under the norms by AICTE / Govt. of Maharashtra / Savitribai Phule Pune University.

**How to Apply**: Application along with resume, attested copies of testimonials, experience certificates, latest salary slip, recent passport size colour photo should reach in the office of **The Founder Secretary, Sinhgad Technical Education Society, 19/15, Erandwane, Smt. Khilare Marg, Off. Karve Road, Pune - 411004** within 10 days from the date of publication of this advertisement. Candidate should bring the original copy of testimonials at the time interview. Selected candidates will be required to work at any of the institutes of STES. An envelope containing the application should be superscribed “Post & Branch / Subject Applied”.

*Subject to Pune Jurisdiction Only

**Dr. (Mrs.) Sunanda M. Navale**
Founder Secretary



**शुभमन गिलची रणजी ट्रॉफीतून माघार**

भारतीय स्टार क्रिकेटपटू रोहित शर्मा, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत, शुभमन गिल, रविंद्र जडेजा रणजी ट्रॉफी स्पर्धेतील सातव्या फेरीच्या सामन्यात सहभागी झाले होते. परंतु शुभमन गिल व रविंद्र जडेजा वगळता कोणालाही यशस्वी कामगिरी करता आली नाही. पंजाब संघाचा कर्णधार शुभमन गिलने या सामन्यात शतकी कामगिरी केली व रविंद्र जडेजाने सामन्यात एकूण १२ विकेट्स घेतल्या. तर, या सामन्यात न खेळलेल्या विराट कोहली, केएल राहुल मोहम्मद सिराज यांनी पुढील सामना खेळणार असल्याचे सांगितले. पण, शतकवीर शुभमन गिलने रणजी ट्रॉफीतील पुढील सामना खेळणार नसल्याचे समजत आहे. भारतीय सलामीवीर केएल राहुल ३० जानेवारीपासून सुरू होणारा रणजी ट्रॉफी स्पर्धेतील पुढील सामन्यात कर्नाटक संघाकडून खेळणार आहे. हरियाणाविरूद्ध बंगळूरू येथे हा सामना खेळवण्यात येणार असून कर्नाटक क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रघुराम भट यांनी राहुलची पुढील सामन्यासाठी उपस्थिती निश्चीत केली आहे. त्याचबरोबर विराट कोहली मानेच्या दुखापतीमुळे मागचा रणजी सामना खेळू न शकला नव्हता.

# इंग्लंडसाठी 'करो वा मरो'

## सामन्यासाठी इंग्लंडची प्लेइंग-११ जाहीर!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**राजकोट :** इंग्लंड क्रिकेट संघ सध्या भारत दौऱ्यावर असून टी२० मालिका खेळत आहे. या मालिकेतील तिसरा सामना मंगळवारी (२८ जानेवारी) निरंजन शाह स्टेडियम, राजकोट येथे खेळवला जाणार आहे. हा सामना पाच सामन्यांच्या टी२० मालिकेतील निर्णायक सामनाही आहे. या सामन्यासाठी इंग्लंडने एक दिवस आधीच प्लेइंग इलेव्हनची घोषणा केली आहे.

इंग्लंडने दुसऱ्या सामन्यात खेळवलेली प्लेइंग इलेव्हनच तिसऱ्या सामन्यासाठीही कायम केली आहे. त्यामुळे सामन्यातही जेकॉब बेथल आणि गस ऍटकिन्सन यांना संधी मिळालेली नाही. पहिल्या सामन्यात खेळल्यानंतर दुसऱ्या सामन्यासाठी या दोघांनाही प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळाली नव्हती.



**निर्णायक सामना :** भारतीय संघाने इंग्लंडविरुद्ध टी२० मालिकेतील पहिले दोन्ही सामने जिंकले आहेत. त्यामुळे भारतीय संघ ५ सामन्यांच्या टी२० मालिकेत सध्या २-० अशा फरकाने आघाडीवर आहे. त्यामुळे तिसरा सामना इंग्लंडसाठी करो वा मरो असणार आहे. भारताने जर तिसरा सामना जिंकला, तर भारतीय संघ मालिकाही खिशात घालेल, पण जर इंग्लंडने तिसरा सामना जिंकला, तर त्यांना मालिकेतील आव्हान कायम राखता येणार आहे.

बेथल आजारी असल्याचे बटलरने सांगितले होते. तसेच ऍटकिन्सनला वगळून ब्रायडन कार्सला संधी देण्यात आली होती. कार्सने या संधीचे सोने करताना फलंदाजी आणि गोलंदाजी अशा दोन्ही विभागात योगदान दिले होते.

त्याने दुसऱ्या टी२० सामन्यात १७ चेंडूत ३१ धावा केल्या होत्या, तर ३ विकेट्सही घेतल्या होत्या. याशिवाय संघात कर्णधार जॉस बटलरसह बेन डकेच, फिल सॉल्ट, हॅरी ब्रुक, लियाम लिव्हिंगस्टोन कायम आहेत. तसेच गोलंदाजी फळीतही जोफ्रा आर्चर, आदिल राशीद आणि मार्क वूड हे कायम आहेत.

**इंग्लंडची प्लेइंग इलेव्हन**

बेन डकेट, फिलिप सॉल्ट (यष्टीरक्षक), जॉस बटलर (कर्णधार), हॅरी ब्रूक, लियाम लिव्हिंगस्टोन, जेमी स्मिथ, जेमी ओव्हरटन, ब्रायडन कार्स, जोफ्रा आर्चर, आदिल राशीद, मार्क वुड

## स्मृतीचा जलवा!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून २०२४ वर्षात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सन्मान करण्यात येत असून पुरस्कार विजेत्यांची नावंही घोषित केली जात आहेत. आयसीसीने सोमवारी (२७ जानेवीरी) वनडेतील सर्वोत्तम महिला आणि पुरुष क्रिकेटपटू पुरस्कार विजेत्यांची घोषणा केली आहे. यादरम्यान, भारतासाठीही आनंदाची बातमी मिळाली आहे.


भारताची स्टार क्रिकेटपटू आणि उपकर्णधार स्मृती मानधनाला आयसीसीचा सर्वोत्तम महिला वनडे क्रिकेटपटू २०२४ पुरस्कार मिळाला आहे. तिने हा पुरस्कार मिळवताना दिग्गज खेळाडूंना मागे टाकले आहे. मानधनाची २०२४ वर्षात अप्रतिम कामगिरी झाली आहे. तिच्यासाठी हे वर्ष वनडेमध्ये यशस्वी वर्षांपैकी एक ठरले. तिने दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, वेस्ट इंडिज या संघाविरुद्ध वनडे क्रिकेट खेळले आहे. तिने २०२४ वर्षात वनडेमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी केली. तिने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वनडे मालिकेत तीन सामन्यात ३४३ धावा केल्या होत्या, तिने ऑस्ट्रेलियाविरुद्धही शतक ठोकले.

## स्पोर्ट्स मॅनियाचा सलग दुसरा पराभव



**पुणे :** स्पोर्ट्स एरिना टर्फ, वाकड येथे झालेल्या एआयएफएफ एलिट युथ लीगच्या राउंड 8 सामन्यामध्ये स्पोर्ट्स मॅनियाला ग्रुप टॉपर्स झिंक फुटबॉल ॲकॅडमीकडून 1-4 असा पराभव पत्करावा लागला. घरच्या मैदानावरील (होम गेम) त्यांचा हा पहिला पराभव आहे. ग्रुप-एच सामन्यात स्पोर्ट्स मॅनियाला लीगमधील दुसऱ्यांदा पराभवाला सामोरे जावे लागले. या महिन्याच्या सुरुवातीला 'अवे लेग' गेम गमावल्यानंतर झिंक फुटबॉल अकॅडमीविरुद्धची हार हा दुसरा पराभव होता. झिंक एफएच्या निखिल गोपेच्या (पहिले मिनिट) सुरेख गोलमुळे स्पोर्ट्स मॅनिया सुरुवातीला बॅकफूटवर फेकला गेला. पाच मिनिटांनंतर पृथ्वीराज पाटीलने (6व्या) स्पोर्ट्स मॅनियाला बरोबरी साधून दिली. त्यामुळे मध्यंतराला (हाफ टाईम) 1-1 अशी बरोबरी होती. उत्तरार्धाच्या सुरुवातीला हिमांशूने (47व्या) झिंक एफसीला (2-1) आघाडीवर नेले. तीन मिनिटांनंतर हिमेश मीनाने (५०व्या मिनिटाला) आघाडी (३-१) आणखी वाढवली.

## व्हॅस्कॉन द होली वन्स, मानव पारी संघांची चमकदार कामगिरी



**पुणे :** पूना क्लब लिमिटेड यांच्या वतीने आयोजित पूना क्लब गोल्फ लीग स्पर्धेत आजच्या दिवसातील लढती अत्यांत चुरशीच्या व रोमांचकारी ठरल्या. क गटात व्हॅस्कॉन द होली वन्स आणि मानव पारी पिन सिकर्स यांनी प्रत्येकी 38.5गुणांसह संयुक्त आघाडी राखली आहे. तसेच, केके रॉयल्स संघाने अ गटात ऑटोमेक बेकर्स इतकेच 35 गुण मिळवून संयुक्त पहिले स्थान राखले आहे. येरवडा येथील पूना क्लब गोल्फ येथे सुरू असलेल्या ड्यूकॅटी लीगसी मोटर्स यांचे मुख्य प्रायोजकत्व लाभलेल्या इरिगेशन प्रॉडक्टस प्रायव्हेट लिमिटेड, टोरो, कोलते पाटील डेव्हलपर्स यांचे सह प्रायोजकत्व लाभलेल्या या स्पर्धेत हिलयॉस ईगल्स संघाने 48.5गुणांसह संपूर्ण स्पर्धेतील आपल्या आघाडीचे स्थान कायम राखले आहे. ब गटातील शुबान सनरायजर्स संघाने 37.5 गुणांसह दुसरा क्रमांक राखला असून इव्हेंट डायनामिक पार टी टायगर्स संघाने 24 गुणांसह तिसरे स्थान मिळवले आहे. हिलयॉस ईगल्स संघाने इव्हेंट डायनामिक पार टी टायगर्स संघाचा पराभव केला. रुद्रांश वर्धन सिंग, मोनिश ठाकूर, सुनील बदामी आणि अनिता पुनामिया यांनी उत्कृष्ट पटिंग करताना संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## बुमराह ठरला २०२४ चा सर्वोत्तम कसोटीपटू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून २०२४ पुरस्कार विजेत्यांची घोषणा करण्यात येत असून मानाचा मानला जाणारा सर्वोत्तम कसोटीपटूचा पुरस्कार सोमवारी जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार जिंकण्याचा मान भारताचा दिग्गज वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला मिळाला आहे तो आयसीसीचा हा प्रतिष्ठीत पुरस्कार जिंकणारा सहावा भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे.

बुमराहची २०२४ वर्षात कसोटीमध्ये अफलातून कामगिरी झाली आहे. त्याच्यापूर्वी भारताच्या राहुल द्रविड (२००४), गौतम गंभीर (२००९), विरेंद्र सेहवाग (२०१०), आर अश्विन (२०१६) आणि विराट कोहली (२०१८) यांना हा पुरस्कार मिळाला आहे.

त्यामुळे आता सर्वाधिकवेळा सर्वोत्तम कसोटीपटूचा पुरस्कार जिंकणाऱ्या देशांच्या यादीत भारताने ऑस्ट्रेलियाची बरोबरी केली आहे. ऑस्ट्रेलियाच्याही ६ खेळाडूंनी हा पुरस्कार जिंकला अून स्टीव्ह स्मिथने २०२५ आणि २०१७ असे दोनदा हा पुरस्कार जिंकला आहे.



जसप्रीत बुमराहने २०२४ मध्ये भारताला इंग्लंड आणि बांगलादेश संघांविरुद्ध कसोटी मालिकेत विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. तसेच त्याने दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियातही दमदार कामगिरी केली. त्याने या वर्षभरात १३ कसोटी सामन्यांमध्ये ७१ विकेट्स घेतल्या आहेत.

## ॲडव्हान्स क्रिकेट अकादमीची स्थापना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील ऐतिहासिक क्रिडा संस्था असलेल्या पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या वतीने व दोशी इंजिनियर्स यांच्या सहकार्याने 14, 16 व 19 वर्षाखालील खेळाडूंसाठी तसेच, महिला व पुरुषांसाठी आधुनिक सुविधा असलेल्या क्रिकेट अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. गुणवान व उदयोन्मुख क्रिकेट पटूना जागतिक दर्जाच्या सुविधांसह विनामूल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देणे व त्यांना सर्वोच्च स्तरावर उत्तम कामगिरी करण्यासाठी संधी मिळवून देणे हा या अकादमीचा उद्देश आहे. यातील प्रत्येक वयोगटासाठी गेल्या तीन महिन्यांत संपूर्ण राज्यभरात पार पडलेल्या निवड चाचणीतून जिल्ह्यातील 500 हून अधिक खेळाडूंमधून निवडण्यात आलेल्या 20 खेळाडूंचा समावेश असणार आहे.

या अकादमीचे उदघाटन महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहित पवार व दोशी इंजिनियर्सचे व्यवस्थापकीय संचालक अमित दोशी यांच्या हस्ते करण्यात आले.





पीवायसी हिंदू जिमखाना क्लबचे महाराष्ट्र क्रिकेटसाठी मोठे योगदान आहे. दोशी इंजिनियर्सच्या सहाकार्याने सुरु होणारी ही अकादमी हे त्याचे पुढचे पाऊल आहे. अकादमीसाठी संपूर्ण ५० लाख रुपयाचे अर्थसहाय्य करणाऱ्या अमित दोशी आणि दोशी कुटुंबियांचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. त्यांनी ही मदत प्रायोजक म्हणून केली असली, तरी मी तसे मानत नाही. ही मदत भविष्यात उदयास येणाऱ्या क्रिकेटपटूंना आहे असे महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहित पवार म्हणाले.

पीवायसी आणि दोशी इंजिनियर्सच्या सहकार्याने सुरु होणाऱ्या १४, १६ आणि १९ वर्षांखालील क्रिकेट अकादमीचे उदघाटन रोहित पवार यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या अकादमीतून अनेक युवा खेळाडू घडणार आहेत. बीसीसीआयचे प्रशिक्षक येथे काम करणार असल्याने खेळाडूंना अचूक आणि योग्य मार्गदर्शन मिळेल यात शंकाच नाही. त्यामुळे अकादमीतून केवळ पीवायसीलाच नाही, तर भारतासाठी खेळणारे खेळाडू उदयास येतील असा विश्वासही पवार यांनी व्यक्त केला.

पीवायसी हिंदू जिमखानाचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे याप्रसंगी म्हणाले की, या विनामूल्य क्रिकेट अकादमी व प्रशिक्षण सुविधेचे उदघाटन करताना आम्हाला आनंद होत आहे. युवा खेळाडूंना त्यांचे कौशल्य विकसित करण्यासाठी सर्वोत्तम सुविधा या ठिकाणी उपलब्ध आहेत.

## हर्षद कोकाटे व तानाजी झुंझुरकेची पुणे शहर संघाकडून निवड





**पुणे :** पुणे राष्ट्रीय तालीम संघाच्या वतीने अहिल्यानगर येथे होणाऱ्या वरिष्ठ राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी पुणे शहर संघ निवड चाचणी कुस्ती स्पर्धा २५ जानेवारीला संपन्न झाली. गादी विभागातुन पै. हर्षद कोकाटे तर माती विभागातुन पै. तानाजी झुंझुरके पुणे शहर संघाकडून महाराष्ट्र केसरी किताबासाठी झुंजणार आहे. याप्रसंगी आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या शुभहस्ते कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन झाले व आमदार शंकरभाऊ मांडेकर यांच्या शुभहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय तालीम संघाच्या वतीने वरील मान्यवरांचा आमदार पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष तात्यासाहेब भिंताडे, कार्याध्यक्ष गुलाबराव सोनावणे, वस्ताद नरहरी चोरघे, सरचिटणीस शिवाजीराव बुचडे, वरिष्ठ उपाध्यक्ष जयसिंग आण्णा पवार, वस्ताद सुभाष पोकळे, उपाध्यक्ष मधुकरराव फडतरे आदी मान्यवर उपस्थित होते.

**स्पर्धेचे निवड झालेले पहलवान**

- (गादी विभाग) ५७कि - धनराज शिर्के, ६१कि- पृथ्वीराज कोंडे, ६५ कि श्रीकृष्ण राऊत, ७० कि अनुदान चव्हाण, ७४ कि करणं फुलमाळी, ७९कि - शुभम थोरात, ८६कि मयुर दगडे, ९२कि शक्ती बारगुजे, ९७कि सौरभ शिंदे, ८६ते१२५कि महाराष्ट्र केसरी - पै. हर्षद कोकाटे.
- (माती विभाग) ५७कि - किरण करे, ६१कि रोशन खुळे, ६५कि आविष्कार गावडे, ७०कि निखिल कदम, ७४ कि - अक्षय चव्हाण, ७९कि संदीप गायकवाड, ८६कि अभिजित झेंडे, ९२कि अर्थव चव्हाण, २७कि लौकिक सुर्वे, ८६ ते १२५ कि महाराष्ट्र केसरी - पै. तानाजी झुंझुरके

## नॅशनल गेम्ससाठी महाराष्ट्र सज्ज, अजित पवारांच्या हस्ते ध्वज हस्तांतरण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डेहराडून (उत्तराखंड) येथे होणाऱ्या 38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचा ध्वज राज्याचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते पथकप्रमुख संजय शेटे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. महाराष्ट्राचे खेळाडू गत स्पर्धेप्रमाणेच विजेतेपद खेचून आणतील असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संघाला शुभेच्छा देताना व्यक्त केला.

38 वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी टीम महाराष्ट सज्ज झाले असून



जागतिक पदक विजेती आर्चरी खेळाडू आदिती स्वामी व जगज्जेत्या भारतीय खो-खो संघाचा कर्णधार प्रतिक वाईकर यांना महाराष्ट्र संघाचे ध्वजवाहक होण्याचा मान मिळाला आहे. उद्घाटन सोहळ्यातील संचलनात फडविणाऱ्या जाणारा ध्वजाचा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पथकप्रमुख संजय शेटे यांना स्वीकार केला. शिवाजीनगर येथील पोलिस मैदानातील ध्वजारोहन कार्यक्रम प्रसंगी पार पडलेल्या ध्वज हस्तांतरण समारंभास महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे (एमओए) महासचिव नामदेव शिरगावकर,पथकप्रमुख संजय शेटे, उपपथकप्रमुख उदय डोंगरे, सुनील पूर्णपात्रे व स्मिता शिरोळे उपस्थित होत्या.

मानाचा ध्वज हस्तांस्तरित केल्यानंतर महाराष्ट्राच्या पथकास शुभेच्छा देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, गत स्पर्धेत विक्रमी 228 पदके जिंकून सर्वसाधारण विजेतेपद पटकावले होते. महाराष्ट्राचे खेळाडू गत स्पर्धेप्रमाणेच विजेतेपद खेचून आणतील. स्पर्धेतील विजेत्यांना राज्य शासनाकडून भरघोस बक्षिसे दिले जाणार आहेत.


## क्रिकेट स्पर्धेत वेदिक फिट क्रिकेट क्लबचा विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक 13 वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत राजवीर काळभोर(5-35) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर वेदिक फिट क्रिकेट क्लब संघाने बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी ब संघाचा 7 गडी राखून पराभव करत पहिला विजय नोंदवला.

चिखली येथील सिल्व्हर क्रिकेट क्लब क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत दुसऱ्या सामन्यात विराज फराटे(3-4) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीसह






यशवर्धन आजबे(69धावा) याने केलेल्या फलंदाजीसह क्रीक फायटर्स संघाने क्रीक9 क्रिकेट अकादमी संघाचा 74धावांनी पराभव करत तिसऱ्या विजयाची नोंद केली.

## मेट्रो क्रिकेट क्लबचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पाचव्या दोशी इंजिनिअर्स करंडक आंतरक्लब वरिष्ठ निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत सोहम शिंदे (69धावा), सुहेल श्रीखंडे 56धावा)यांनी केलेल्या अर्धशतकी खेळीसह आकाश तनपुरे(3-32), विघ्नेश पाटील(3-24) यांनी केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर मेट्रो क्रिकेट क्लब संघाने व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमी चा 196 धावांनी धुव्वा उडवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

पीवायसी हिंदू जिमखाना क्रिकेट मैदानावर झालेल्या या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत प्रथम फलंदाजी करताना मेट्रो क्रिकेट क्लब संघाने 42 षटकात 9बाद 263धावाचे आव्हान उभे केले. सलामवीर सोहम शिंदेने 78चेंडूत 10चौकार व 2 षटकारासह 69 धावा



केल्या.सोहम याने अनंतकुमार शिंदे 19)क्या साथीत 72चेंडूत 81 धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्यानंतर सुहेल श्रीखंडेने 42चेंडूत 6चौकार व 3षटकाराच्या मदतीने 56 धावांची आक्रमक खेळी केली. सुहेलने शुभम खरात(27धावा) च्या साथीत सहाव्या विकेटसाठी 51चेंडूत 68धावांची भागीदारी करून संघाला आव्हानात्मक धावसंख्या उभारून दिली. या आव्हानाचा पाठलाग करताना व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमीचा डाव 20.4 षटकात सर्वबाद 70धावावर संपुष्टात आला. यात यश जगदाळे 16, ओम भाबड 13 यांनी थोडासा प्रतिकार केला. मेट्रो क्रिकेट क्लब संघाकडून आकाश तनपुरे(3-32), विघ्नेश पाटील(3-24), शुभम खरात(2-9) यांनी अचूक गोलंदाजी करत संघाला क्लब 196 धावांनी विजय मिळवून दिला.

### नाशिकचा आकाश शिंदे, मुंबई शहरची सोनाली शिंगटे कप्तान

## महाराष्ट्राच्या कबड्डी संघाची घोषणा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उत्तराखंड येथे दिनांक २८ जाने. ते ०३ फेब्रु. या कालावधीत होणाऱ्या "३८व्या राष्ट्रीय क्रीडा" स्पर्धेकरीत महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.ने आपले पुरुष व महिला कबड्डी संघ घोषित केले. नाशिकच्या आकाश शिंदे कडे पुरुष, तर मुंबई शहरच्या सोनाली शिंगटे कडे महिला संघाचे नेतृत्व सोपविण्यात आले. ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पुरुष संघ कास्य पदकाचा मानकरी ठरला होता. तर महिलांना पदकाविना परतावे लागले होते. यंदाच्या पुरुष संघात नवोदितांना अधिक संधी देण्यात



आली आहे. पुणे येथील बालेवाडी येथील क्रीडा संकुलात या दोन्ही संघांचा सराव सुरू होता. निवडण्यात



आलेल्या या संघाची घोषणा राज्य कबड्डी असो.चे सचिव बाबुराव चांदेरे यांनी केली.

**निवडण्यात आलेले संघ खालील प्रमाणे...**

- **पुरुष संघ:-** १)आकाश शिंदे - संघनायक, २)शिवम पठारे, ३)अजित चव्हाण, ४)शुभम शेळके, ५)पंकज मोहिते, ६)अक्षय बरडे, ७)श्रेयस उमरदंड, ८)संभाजी वाबळे, ९)सुरेश जाधव, १०)ओमकार पाटील, ११) विशाल ताठे, १२)तुषार आदवडे.
- **प्रशिक्षक:-** आत्माराम कदम, व्यवस्थापक :- मालोजी भोसले
- **महिला संघ :-** १)सोनाली शिंगटे - संघनायिका, २) रेखा सावंत, ३)सलोनी गजमल, ४)निकिता पडवळ, ५)मंदिरा कोमकर, ६)आम्रपाली गलांडे, ७) समरीन बुरोंडकर, ८)साधना विश्वकर्मा, ९)दिव्या गोगावले, १०) माधुरी गवंडी, ११)ज्युली मिस्किता, १२)कोमल देवकर.
- **प्रशिक्षक :-** राजेश पाडावे, **व्यवस्थापिका :-** वर्षा मुंडे.